लातूर
# भूकंप
LATUR BHUKAMP
संपादक: अशोक चिंचोले

सांज दैनिक : शुक्रवार - २८ जुलै २०२३
वर्ष - ३७ वे
अंक - १२०
पाने - ४
E-Mail : dailybhukamp@gmail.com
RNI No. MAHMAR/2012/42770
☎ : -9422072823,251822
epaper.dainikbhukamp.com

किंमत २ रूपये


लातूर - तिरुपती
श्री. बालाजी दर्शनासहित
A/C SLEEPER | AIR SUSPENSION
ऑगस्ट महिन्याचे वेळापत्रक
ऑगस्ट महिन्याच्या तारखा
◂ दर मंगळवारी ▸
1 8 22 29
दुपारी २.०० वा.
अधिक माहितीसाठी संपर्क
88888 50441
88888 45404
विश्व ट्रॅव्हल्स लातूर.

## त्यांच्या मते....

▣ हिम्मत असेल तर मला संपवून दाखवाच

– उद्धव ठाकरे

- - - - - - - - - -

चाळीस आमदार फोडले, पक्षाचे नाव, चिन्ह हिरावले आणखी काय संपवायचे.

▣ बडनेरा येथील सभेत संभाजी भिडे यांनी महात्मा गांधी यांच्या चारित्र्यावर अत्यंत खालच्या पातळीवर जाऊन शिंतोडे उडविले.

– एक बातमी

- - - - - - - - - -

जागेवरच भिडे चे तोंड बंद करायला पाहिजे.

▣ आदिवासी रात्रीचा कार्यक्रम करतात ते बिचारे शुद्धीत नसतात आणि त्यांचा कार्यक्रम केला जातो.

– जितेंद्र आव्हाड

- - - - - - - - - -

बरे झाले, आव्हाड यांनी माफी मागितली नाही तर ते आपल्या मतावर ठाम राहिले असते.

▣ उद्धव ठाकरे यांनी सत्ता घरापूरती वापरली.

– चंद्रशेखर बावनकुळे

- - - - - - - - - -

सत्ता कोण घरासाठी, कोण परिवारासाठी वापरतात जनतेसाठी कधी वापरणार?

# थकीत एफआरपी प्रकरणी कारखानदारांना नोटीसा

पुणे : राज्यातील साखर कारखान्यांकडे सुमारे ८१० कोटी रूपये एफआरपी थकीत आहे. या प्रकरणी साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी नोटीसा बजावल्याने थकीत एफआरपी मिळण्याची आशा निर्माण झाली आहे.

राज्यातील साखर कारखानदारांकडे ऊस उत्पादक शेतकऱ्यांची ८१७ कोटी रुपयांची एफआरपी थकीत आहे. या साखर कारखान्यांच्या विरोधात राज्य शासनाने कारवाईची ठाम भूमिका घेतली आहे. स्वतः राज्याच्या मुख्य सचिवांनी या प्रकरणात लक्ष घातले आहे. २०२२-२३ मधील ऊसाच्या गाळप हंगामात २११ साखर कारखान्यांनी शेतकऱ्यांकडून ऊसाची खरेदी केली होती. त्यातील १२५ कारखान्यांनी १०० टक्के एफआरपी चुकती केली आहे. मात्र ७९ कारखान्यांनी ८० ते ९९ टक्के एफआरपी दिली आहे. दोन कारखान्यांनी ६० ते ८० आणि पाच कारखान्यांनी ५० टक्केचं एफआरपी थकवली आहे. यातील नऊ कारखान्यांच्या विरोधात साखर आयुक्तालयाने महसूल वसुली प्रमाणपत्र (आरआरसी) जारी केले आहे. आरआरसी काढताच संबंधित कारखान्याच्या मालमत्ता जप्त करून शेतकऱ्यांना थकबाकीची रक्कम दिली जाते.

शेतकऱ्यांना कोणत्याही परिस्थितीत लवकरात लवकर थकित रकमा मिळायला हव्यात. त्यासाठी साखर आयुक्तालयाने कडक पावले टाकावीत, अशा सूचना राज्याचे मुख्य सचिव मनोज सौनिक यांनी दिल्या आहेत. त्यामुळं साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी नऊ साखर कारखान्यांच्या मालमत्ता जप्तीबाबत राज्यातील विविध जिल्हाधिकाऱ्यांना पत्रे पाठवली आहेत. ज्या साखर कारखान्यावर आरआरसी करण्यात आलेली आहे. या कारखान्याकडून थकित रकमेची वसुली करण्यासाठी तत्काळ पावले उचलण्याच्या सूचना राज्याच्या मुख्य सचिवांनी दिल्या आहेत. त्यामुळे आरसीसी प्रक्रिया त्वरित पूर्ण करावी, असे साखर आयुक्तांनी जिल्हाधिकाऱ्यांना लिहिलेल्या पत्रात नमूद केलं आहे. याबाबत साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी उस्मानाबाद, लातूर, सोलापूर, जालना, औरंगाबाद येथील जिल्हाधिकाऱ्यांशी स्वतः संपर्क साधला आहे. केंद्र सरकारनं दिलेल्या माहितीनुसार आत्तापर्यंत कारखान्यांनी ९१.६ टक्क्यांपेक्षा जास्त ऊसाची थकबाकी शेतकऱ्यांना अदा केली आहे. मागील वर्षीच्या तुलनेत अदा केलेली ऊसाची थकबाकी ही कमी आहे. मागील वर्षी ९९.९ टक्क्यांपेक्षा जास्त ऊसाची थकबाकी पूर्ण केली होती. दरम्यान, देशातील कोणत्याही भागापेक्षा जास्त एफआरपी वाटप महाराष्ट्रात झाले आहे. एफआरपीची थकित रक्कमदेखील दीड टक्क्याच्या आसपास आहे. परंतू, तीसुद्धा राहू नये यासाठी साखर आयुक्तालयाकडून गांभीर्याने पाठपुरावा सुरु असल्याची माहिती साखर आयुक्त चंद्रकांत पुलकुंडवार यांनी दिली आहे.

# सुनील यादव लातूरचे अपर जिल्हाधिकारी



लातूर : राज्य महसूल विभागाने राज्यातील अपर जिल्हाधिकारी संवर्गातील १६ अधिकाऱ्यांच्या बदल्यांचे आदेश काढले असून लातूर येथे अपर जिल्हाधिकारी म्हणून सुनील यादव हे येत आहेत. लातूरचे अपर जिल्हाधिकारी अरविंद लोखंडे यांची बदली याच पदावर औरंगाबाद येथे करण्यात आली आहे.

राज्य शासनाने काढलेल्या बदली आदेशानुसार औरंगाबादचे अपर जिल्हाधिकारी डॉ. अनंत गव्हाणे यांची बदली औरंगाबाद विभागीय आयुक्त कार्यालयात उपायुक्त (रोहयो) म्हणून करण्यात आली आहे. सुनील यादव हे यापूर्वी अंबाजोगाई येथे अपर जिल्हाधिकारी होते ते आता लातूरला अपर जिल्हाधिकारी म्हणून येत आहेत. जालनाचे अपर जिल्हाधिकारी भानुदास पिनाटे यांची बदली बुलडाणा येथे याच पदावर झाली आहे. विजयसिंह देशमुख यांची बदली अंबाजोगाई येथे झाली आहे. औरंगाबाद विभागीय आयूक्त कार्यालयातील उपायुक्त (रोहयो) यांची बदली पुणे विभागीय आयूक्त कार्यालयात आयूक्त (पुरवठा) या पदावर झाली आहे.

## नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना वाढीव दराने मदत, मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंची विधानसभेत घोषणा

मुंबई : सध्या राज्यभरात पावसाचा वेग वाढला असून काही भागात अतिवृष्टी आणि पुराच्या पाण्यामुळे नागरिकांच्या घरांचे आणि मालमत्तेचे नुकसान झाले आहे. राज्य शासनाने नेहमीच अशा प्रसंगात आपत्तीग्रस्तांना मदतीचा हात दिला असून नुकसानीसाठी प्रती कुटुंब दहा हजार रुपये वाढीव मदतीची आणि दुकानदार, टपरी धारक यांना सुद्धा आर्थिक मदत देण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधानसभेत केली. ही वाढीव मदत जून ते ऑक्टोबर, २०२३ या चालू पावसाळ्यातील नैसर्गिक आपत्तीसाठी देण्यात येईल. विधानसभेत केलेल्या निवेदनात मुख्यमंत्र्यांनी वाढीव मदतीबाबत माहिती दिली.

## लातुरात घर, फ्लॅट घेवून देतो म्हणून २९ लाखांची फसवणूक

अहमदपूर : लातूरमध्ये माझे मोठे नातेवाईक बिल्डर आहेत. त्यांच्या मार्फत लातूर-बाभळगाव रोडवर तसेच अहमदपूर, शिरूर ताजबंद येथे घर, फ्लॅट घेवून देतो म्हणून २९ लाख रूपयांची फसवणूक केल्या प्रकरणी पती, पत्नी व त्यांच्या मुलाविरूद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

अमिरबी इलियास शेख रा. हाडोळती, ता. अहमदपूर यांच्याकडून व इतरांकडून चंद्रकला ईश्वर भुसारे, ईश्वर बापूराव भुसारे, सुदर्शन ईश्वर भुसारे तिघेही रा. हाडोळती, ता. अहमदपूर यांनी लातूर-बाभळगाव रोडवर, अहमदपूर व शिरूर ताजबंद येथे घर, फ्लॅट घेवून देतो म्हणून करार केला. घर घेवून देण्यापोटी भुसारे कुटुंबियांनी २९ लाख १० हजार रूपये घेतले. नंतर घर, फ्लॅट संदर्भात चौकशी करण्यासाठी गेले असता भुसारे कुटुंबियांनी तुम्ही अधिक मागे लागलात तर तुम्हाला जिवंत ठेवणार नाही. नाहीतर तुमच्या नावे चिठ्ठी ठेऊन औषध पिऊन मरेन अशी धमकी दिली. १९ जानेवारी २०२३ ते २९ मे २०२३ दरम्यान घर, फ्लॅट देतो म्हणून पैसे घेतले होते. या प्रकरणी अमदपूर पोलिसांत चंद्रकला भुसारे, ईश्वर भुसारे, सुदर्शन भुसारे यांच्या विरोधात फसवणुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलीस निरीक्षक एस. आर. देडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक अंधोरीकर हे अधिक तपास करीत आहेत.

# १० हजारांची मदत तुटपुंजी : पटोले

मुंबई : महाराष्ट्राचा अर्धा भागात अतिवृष्टीत बुडाला आहे आणि अर्ध्या भागात पाऊस पडलेला नाही. शेतकऱ्यावर दुबार पेरणीचे संकट ओढवले आहे. सरकारने १० हजार रुपयांची मदत जाहीर केलेली आहे पण दुबार पेरणीसाठी बियाणे, खत, डिझेल लागते, पेरणीचा खर्च जास्त येते. त्यामुळे नुकसानीच्या प्रमाणात सरसकट मदत करावी, अशी मागणी काँग्रेस पक्षाने केल्याची माहिती महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी केली आहे.

विधान भवन परिसरात प्रसार माध्यमांशी संवाद साधताना नाना पटोले म्हणाले की, शेतकरी संकटात सापडलेला असताना सरकारने त्याला भरीव मदत करण्याची गरज आहे. पण सरकारने जाहीर केलेली मदत ही जखमेवर मीठ चोळणारी आहे. दुबार पेरणी केली तरी पीक येईलच याची शाश्र्वती नाही, पीक वाया गेल्याने शेतकऱ्यांचे वर्षभराचे नुकसान झाले आहे. पावसाने नागपुरसह काही भागात गरिबांची घरे पडली आहेत तर काही घरे खचली आहेत. या गरिबांना घरकुल योजनेतून घरे दिली पाहिजेत. टपरी वाल्यांचेही मोठे नुकसान झाले आहे त्यांनाही मदत देण्याची गरज आहे. पावसामुळे बेघर झालेल्या लोकांना कॅम्पमध्ये जाऊन सर्व मदत दिली पाहिजे. सरकारने तातडीने मदत करण्याची गरज आहे पण हे सरकार गरिब व शेतकऱ्यांवर अन्याय करत आहे. सरकारच्या घोषणा या सुद्धा पावसासारख्या भरघोस आहेत पण प्रत्यक्षात मदत मिळेपर्यंत काही खरे नाही.

राज्यातील असंवैधानिक तिघाडी सरकार सर्व आघाड्यांवर अपयशी ठरले आहे. सरकार अपयशी असते तेंव्हा मोर्चांचे प्रमाणही जास्त असते. भर पावसातही यावेळी शेकडो मोर्चे आले आहेत. माझ्या ३० वर्षांच्या कालावधीत पावसाळी अधिवेशनात एवढे मोर्चे कधी पाहिले नाहीत. सावित्रीबाई फुलेंच्या महाराष्ट्रात महिलांचा अपमान व महिला बेपत्ता होणे दुर्दैवी आहे.

राज्यातून १५ हजार महिला बेपत्ता झाल्या आहेत पण त्याबद्दलही सरकार उत्तर देण्यास तयार नाही. शाहु, फुले, आंबेडकरांच्या महाराष्ट्रात दररोज महापुरुषांचा अपमान होत आहे पण सरकार काहीच करत नाही, असे चित्र असल्याचे नाना पटोले म्हणाले.

# अभ्यास, परीक्षा, तयारीसोबतच आहार, व्यायाम महत्वाचे-डॉ.लड्डा

लातूर : इयत्ता आठवी ते दहावीच्या विद्यार्थ्यांसाठी रेनिसन्स इंटरनॅशनल सीबीएसई स्कूलमध्ये करिअर मार्गदर्शन कार्यक्रम घेण्यात आला होता.

या कार्यक्रमास प्रमुख अतिथी म्हणून डॉ. लड्डास् मेडिकल क्लासेसचे संचालक डॉ. विनोद लड्डा यांच्यासह सहसंचालिका डॉ.सौ.अर्चना लड्डा, अभिषेक लड्डा यांची उपस्थिती होती.

यावेळी मार्गदर्शन करताना अभिषेक लड्डा यांनी सध्याच्या परिस्थितीत आपण कशाप्रकारे आपल्या क्षेत्रात यशस्वी होऊ शकतो? त्यासाठी कशी तयारी करावी ? नीट परीक्षा आणि त्याची तयारी कशी करावी? याबाबत माहिती दिली. त्यासोबतच योग,ध्यान, आहार आणि वातावरण कसे महत्वाचे असते याविषयी मार्गदर्शन केले.

प्रमुख मार्गदर्शक डॉ. विनोद लड्डा यांनी करियरच्या संधी कशा असतात,त्यासाठी पालक म्हणून आपण काय करावे ? यश म्हणजे काय ?अभ्यासाचे नियोजन कसे करावे ? आपले भविष्य कसे घडवावे? याची माहिती दिली.केवळ पुस्तक आणि शिक्षक याव्यतिरिक्त माहिती तंत्रज्ञानाच्या विविध माध्यमातून आपण शिक्षण कसे घ्यावे? याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले.

डॉ. अर्चना लड्डा यांनीही सर्व माता- पालकांना आपल्या मुलाच्या आयुष्यात आणि करिअर मध्ये एका आईचे किती आणि कसे महत्व असते याबाबत विचार मांडले.मुलांना चांगल्या सवयी कशा लावाव्यात, छोट्या गोष्टीतून मुलांचे करिअर कसे घडते? आदी विषयावर त्यांनी मार्गदर्शन केले.

प्राचार्य महेश बांगर यांनी डॉ.लड्डा आणि परिवाराच्या समाजोपयोगी कार्याची ओळख करून दिली.अभिषेक यांच्या मेहनतीचे कौतुक करून भविष्यासाठी शुभेच्छा दिल्या. प्रारंभी उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सरस्वती माता आणि छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमांचे पूजन करण्यात आले. उपस्थित मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. शाळेच्या उपप्राचार्या सौ.अनुराधा कुलकर्णी यांनी कार्यक्रमाचे स्वरूप सांगून मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाची सांगता कल्याण मंत्राने करण्यात आली. कार्यक्रमाचे सूत्रसंचलन सौ.सोनाली दर्डा यांनी केले तर प्राचार्य बांगर यांनी आभार मानले.

# बीएसएफ कॅम्प येथे सायबर जनजागृती अभियान



चाकूर : चाकूर उपविभागीय पोलीस कार्यालयाच्या वतीने बीएसएफ कॅम्प चाकूर येथे सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांच्या मार्गदर्शनाखाली 'सायबर सुरक्षा, सायबर साक्षरता व ऑनलाईन फ्रॉड' या विषयावर जनजागृती अभियान राबविण्यात आले.

लातूर पोलिसांच्या वतीने सायबर गुन्ह्यांबाबत माहिती व्हावी यासाठी सायबर गुन्हे जनजागृती अभियान हाती घेण्यात आले आहे. सायबर गुन्ह्यांपासून कसे वाचावे, फसवणूक झाल्यास पोलिसांशी कसा संपर्क साधावा तसेच सायबर गुन्ह्यांबाबतचे कायदे, समाजमाध्यमांतून होणारे लैंगिक छळ, ऑनलाइन व्यवहारात होणारी फसवणूक आणि त्यापासून बचाव यासर्व गोष्टींची माहिती नागरिकांना दिली जात आहे.

खासगी माहितीचा आणि छायाचित्रांचा गैरवापर करून त्यांच्याकडून काही समाजकंटक पैसे उकळतात. या प्रकारच्या गुन्ह्यांबाबत कुठे तक्रार करावी, सायबर गुन्हे शाखेशी कसा संपर्क साधावा तसेच सायबर क्राईम या संकेत स्थळाला भेट देणे याबाबत जनजागृती व्हावी यासाठी हे सायबर गुन्हे जनजागृती अभियान राबविले जात आहे.

सायबर गुन्ह्यांच्या प्रकाराबाबत माहिती, आपली फसवणूक कशी होऊ शकते, मुलांच्या हातात मोबाइल दिल्यावर कोणत्या गोष्टींची काळजी घ्यावी, नोकरीबाबतचे खोटे संदेश ओळखणे, महिलांचे लैंगिक छळ करण्यासाठी गुन्हेगार कोणती प्रणाली वापरतात, सुरक्षित इंटरनेटचा वापर कसा करावा. याबाबत जनजागृती केली जात आहे. त्याचाच एक भाग म्हणून २६ जुलै २०२३ रोजी बीएसएफ कॅम्प चाकूर येथे पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलिस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांचे मार्गदर्शनात चाकूर येथील सहाय्यक पोलीस अधीक्षक निकेतन कदम यांनी सायबर सुरक्षा सायबर साक्षरता व ऑनलाइन फ्रॉड याबाबत मार्गदर्शन केले सदर मार्गदर्शनात खालील मुद्द्यांची माहिती देण्यात आली.

सायबर क्राईम म्हणजे काय याची माहिती देण्यात आली. सायबर क्राईम चे प्रकार याची माहिती देण्यात आली. हॅकिंग:-यामध्ये हॅकर्स संगणकाच्या माध्यमातून प्रतिबंधित क्षेत्रात प्रवेश करून त्यांच्या परवानगीशिवाय संवेदनशील व वैयक्तिक माहिती मिळवतात. सायबर स्टॉकिंग :- ज्यामध्ये पीडीतेचा सोशल मीडिया व संदेश दळणवळणाच्या ऑनलाइन माध्यमातून त्रास दिला जातो. ओळख चोरी(आयडेंटीटी थेफ्ट):-हा गुन्हा सर्वाधिक घडताना दिसतो यामध्ये जे लोक बँकेचे व्यवहार ऑनलाइन पद्धतीने करतात त्यांना प्रामुख्याने टार्गेट करण्यात येते. क्रेडिट आणि डेबिट कार्ड फ्रॉड: अनोळखी व्यक्ती कॉल करून बँकेतून बोलण्याचे भासवून आपली वयक्तिक माहिती (अकाउंट नंबर, कार्ड नंबर, PIN, OTP इत्यादी) मिळवून फ्रॉड करतात. बाल लैंगिकता व गैरवर्तन: यामध्ये बहुतेक सायबर गुन्हेगार स्वतःची ओळख लपवून अल्पवयीन मुलांशी संवाद साधतात. वेब हायजॅक:-यामध्ये एखाद्या व्यक्तीची वेबसाईट बेकायदेशीरपणे हॅक केली जाते व त्यामुळे मुळ मालक त्याचे नियंत्रण व संवेदनशील डाटा गमावतो. खोट्या खरेदी विक्री वेबसाईट: खोट्या वेबसाइट्चा वापर करून कमी किमतीत वस्तू विकण्याचे आमिष देऊन फ्रॉड केला जातो. फिशिंग:- प्रामुख्याने लॉटरी, लकी ड्रॉ इत्यादी जिंकल्याचे भासवून, पैशांचे लालच दाखवून त्यांचे ओटीपी व बँक डिटेल मिळवून फ्रॉड केला जातो. QR Code फ्रॉड: अनोळखी व्यक्ती आपल्याशी व्यापार, खरेदी विक्री, बँक प्रतिनिधी भासवून संपर्क करतात आणि QR code पाठवून आपल्या account मधील पैसे चोरी करतात. Sextortion: यामधे अनोळखी व्यक्ती महिला असल्याचे भासवून आपल्याशी सोशल मीडिया वर मैत्री करतात काही दिवस चॅटिंग केल्यावर व्हिडिओ कॉल ची मागणी करतात आणि त्या दरम्यान समोरून अश्लील व्हिडिओ प्ले करून आपला व्हिडिओ कॉल रेकॉर्ड करतात. ह्या व्हिडिओ चा वापर आपली बदनामी करण्यासाठी करून आपल्याकडून खंडणी उकळतात.

आयोजीत कार्यक्रमास बी.एस.एफ.चे वरिष्ठ अधिकारी व जवान मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच इंटरनेटचा वापर करताना काय करू नये याबाबत खालील प्रमाणे माहिती देण्यात आली.

सोशल मीडियावर कोणत्याही अनोळखी स्त्री किंवा पुरुष यांची फ्रेंड रिक्वेस्ट स्वीकारू नये. कोणत्याही अनोळखी इसमाचा कॉल आल्यास आपला ओटीपी किंवा बँक डिटेल, यूपीआय आयडी कोणासही शेअर करू नये. ऑनलाइन फोन किंवा कोणत्याही पच्या माध्यमातून दाखवल्या जाणाऱ्या अमिषाला बळी पडू नये. सोशल मीडियाचे आपले प्रोफाइल लॉक करून ठेवावेत. आपल्या मोबाईल मध्ये अनोळखी लोकांनी पाठवलेल्या कोणत्याही लिंक वरती क्लिक करू नये. अनोळखी नंबरचा व्हिडिओ कॉल आल्यास व्हिडिओ कॉल उचलू नये. कोणत्याही अनोळखी इसमाने पाठवलेला QR कोड स्कॅन करू नये.

वरीप्रमाणे फ्रॉड झाल्यास काय करावे...

सायबर पोलिस स्टेशन संपर्क करावा. NCCRP PORT-L/ cybercrime.gov.in वर तक्रार करावी. १९३० या टोल फ्री क्रमांकावर कॉल करावा. यामध्ये चाकुर पोलिस स्टेशन येथील पीएसआय घाडगे यांनी देखील मार्गदर्शन केले.



## स्वराज्यकडून लातुरात केक कापून खड्ड्याचा वाढदिवस

लातूरच्या राजीव गांधी चौकात व शाहुपुरी कॉलनीत मोठ्या प्रमाणात खड्डे आहेत. या खड्ड्यात अनेक अपघात झाले. खड्डे बुजवावेत या मागणीसाठी आज स्वराज्य संघटनेचे जिल्हाध्यक्ष अशोक ताकतोडे यांच्या नेतृत्वात खड्ड्यात झाडे लावून, केक कापून प्रशासनाचे लक्ष वेधून घेतले.

# भिडेचा बंदोबस्त करा आणि सभागृहात आजच निवेदन करा : बाळासाहेब थोरात

मुंबई : संभाजी भिडे नावाचा इसम राष्ट्रपित्यावर टीकाटिप्पणी करतो, संपूर्ण देशासाठी लाजिरवाणी गोष्ट आहे सरकारने त्याचा आजच बंदोबस्त करावा आणि त्या संदर्भात सभागृहात निवेदन करावे, मागणी काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी केली.

थोरात पुढे म्हणाले, संभाजी भिडे ही विकृती आहे. त्यांनी देशाचे राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या संदर्भात अत्यंत अवमानकारक विधान केले आहे जे समग्र देशासाठी अत्यंत अस्वस्थ करणारे आहे. संभाजी भिडे वारंवार असं बोलतो, त्याला पाठीशी नेमका कोण घालतो याचा शोध घेणे आवश्यक आहे. संभाजी भिडे यांचा हेतू महाराष्ट्राचे वातावरण अस्थिर करण्याचा आहे हे ओळखले पाहिजे. कोणाच्या राजकीय फायद्यासाठी तो वारंवार अशी विधाने करतो? आम्ही सभागृहात संभाजी भिडेवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. सरकारने आजच या विषयावर कारवाई करावी आणि सभागृहाला सूचित करावे. अन्यथा आम्ही शांत बसणार नाही.

थोरात म्हणाले, पुरोगामी विचार संपवण्यासाठी एक यंत्रणा काम करते, असे आमचे स्पष्ट मत आहे. महापुरुष हे सर्वकालीन असतात, त्यांच्या विचारांचे आणि कृतीचे समाजाच्या उभारणीत मोठे योगदान असते. असे असताना हा सततचा खोडसाळपणा सरकारने सहन करू नये. कालही आम्ही क्रांतिज्योती सावित्रीमाई फुले यांच्यासंदर्भात बदनामीकारक लिखाण करणाऱ्यावर कारवाईची मागणी केली होती. थोरात यांनी सरकारवर आरोप करताना सांगितले, एकूणच या संपूर्ण प्रकरणात सरकार गंभीर दिसत नाही. भिडे सारख्या विकृतीवर वेळीच कारवाई केली तर सरकारचा हेतू शुद्ध आहे असे म्हटले जाईल.

# वृद्धांना सायबर गुन्हेगार बनवत आहेत शिकार, लावत आहेत लाखोंचा चूना




सध्या ऑनलाइन फसवणुकीचा धंदा दिवसेंदिवस वाढत आहे. दिल्लीपासून आंध्र प्रदेशपर्यंत आणि गुजरातपासून आसामपर्यंत देशातील तीन डझनहून अधिक शहरे सायबर गुन्ह्यांचे गड बनली आहेत. झारखंडमधील जामतारा हा सायबर गुंडांचा बालेकिल्ला मानला जात होता. पण आता ते देशाच्या अनेक भागात पसरले आहेत. तुम्हाला हे जाणून आश्र्चर्य वाटेल की देशात जामतारासारखे एक-दोन नव्हे तर तीन डझनहून अधिक जामतारा आहेत.

हरियाणा, दिल्ली, झारखंड, बिहार, पश्र्चिम बंगाल, आसाम, उत्तर प्रदेश, गुजरात आणि आंध्र प्रदेश या सायबर ठगांचे हॉट स्पॉट आहेत. दुसरीकडे, एका अहवालाच्या आधारे, तुमच्या घरातील वडीलधारी मंडळी सायबर फसवणुकीच्या निशाण्यावर आहेत. याची अनेक कारणे आहेत. गेल्या काही महिन्यांत देशातील सर्व ज्येष्ठ नागरिकांची बँक किंवा बँकिंग सेवेच्या नावाखाली लाखोंची फसवणूक झाली आहे. आज आम्ही तुम्हाला काही प्रकरणे सांगणार आहोत आणि ते या फसवणुकीचे बळी का ठरले ते देखील सांगू.

बहुतांश घटनांमध्ये असे दिसून आले आहे की, ठग वापरकर्त्याला एसबीआय बँक किंवा एसबीआयच्या योनो बँकेची व्यक्ती असल्याचे सांगून वृद्धांची फसवणूक करत आहेत. बँकेचे नाव ऐकताच कोणीही त्यांचा ओटीपी किंवा पासवर्ड देतो. पण काही वेळातच सायबर ठग त्याच्या खात्यातून पैसे चोरतात. त्यांना काही समजेल तोपर्यंत त्यांची फसवणूक झालेली असते. तसेच वीजबिल भरण्याच्या आणि आधारकार्ड अपडेट करण्याच्या नावाखाली अनेकवेळा वृद्धांना लक्ष्य करून फसवणूक करण्यात आली आहे. पाहूया ही सर्व प्रकरणे

भारतीय रेल्वेच्या नोकरीतून निवृत्त झालेल्या रवींद्र गौर यांच्या खात्यातून डइख बँकेच्या धजछज ॲपच्या नावावर हजारो रुपये चोरण्यात आले. त्यांना एका ठगाचा मेसेज आला होता, ज्यामध्ये त्याने एका लिंकसह लिहिले होते की, जर तुम्ही तुमचे डइख धजछज खाते आधारशी लिंक केले नाही, तर तुमचे खाते बंद केले जाईल. हा मेसेज वाचून रवींद्रने लिंकवर क्लिक केले. आता त्याने लिंकवर क्लिक करताच ते ठगांपर्यंत पोहोचले आणि चोरांनी त्याच्या खात्यातून २५ हजार रुपये काढून घेतले.

दुसरे प्रकरण मुंबईतील आहे. जिथे एका ७५ वर्षीय महिलेची वीज बिल भरण्याच्या नावाखाली हजारोंची फसवणूक करण्यात आली. त्यांच्या मोबाईलवर एक मेसेजही आला होता, ज्यामध्ये त्यांनी वीज बिल लवकर भरले नाही, तर त्यांच्या घराचे वीज कनेक्शन तोडले जाईल, असे लिहिले होते. महाराष्ट्र सरकारच्या नावाने मेसेज पाठवण्यात आला होता आणि त्यात एक नंबरही होता. २४ तासांच्या आत बिल भरण्यासाठी या क्रमांकावर कॉल करा, असे संदेशात पुढे लिहिले होते.

महिलेने हा प्रकार आपल्या मुलीला सांगितला, मात्र ती व्यस्त असल्याने तिने दिलेल्या नंबरवर कॉल केला. महिलेने नंबरवर कॉल करताच, दुसऱ्या बाजूच्या व्यक्तीने तिला तिची पेमेंट तपशील आणि डेबिट कार्ड नंबर आणि तपशील विचारले. वृद्ध महिलेने सर्व माहिती दिली. काही वेळाने ओटीपीही शेअर केल्यानंतर चोरांनी त्यांच्या खात्यातून १०,००० रुपये चोरले. ही केवळ एक-दोन प्रकरणे नाहीत, तर अशी अनेक प्रकरणे आहेत, जिथे वृद्ध सायबर ठगांचे सॉफ्ट टार्गेट बनत आहेत.

देशात सुमारे १३८ दशलक्ष वृद्ध आहेत. दैनंदिन कामांसाठी बाहेर पडण्याऐवजी त्यांनी तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. त्याच वेळी, हा वर्ग तरुणांपेक्षा अधिक वेगाने चिंताग्रस्त होतो. उदाहरणार्थ, जर कोणी फोनवर सांगितले की तुमचे वीज कनेक्शन कट होणार आहे, तर ते घाबरतील आणि समोरच्या व्यक्तीच्या बोलण्यात येतील. तसेच, त्यांच्यासोबत घडलेल्या अशा गुन्ह्यांची माहिती देण्यास ते कचरतात आणि त्यांची तक्रार करण्यास बराच विलंब होतो. या कारणांमुळे सायबर गुन्हेगार वृद्धांना आपली सहज शिकार मानतात.

याबाबतची तक्रार लवकरात लवकर करा. कारण ही प्रक्रिया आता खूपच सोपी झाली आहे. दहा मिनिटांत तक्रार दाखल करण्याचा प्रयत्न करा. सायबर फसवणुकीची तक्रार १९३० क्रमांकावर कॉल करून करता येईल. याशिवाय https://cybercrime.gov.in या वेबसाइटवर तक्रार करता येईल. तुम्ही संबंधित जिल्हा पोलिस ठाण्यात तक्रार नोंदवू शकता. अशा गुन्ह्यांना सामोरे जाण्यासाठी पोलिसांसाठी रिफ्रेशर कोर्सेस घेण्यात येत आहेत. अनेक वेळा त्यांना प्रशिक्षणासाठी बाहेरही पाठवले जाते, जेणेकरून त्यांना नवीन तंत्रांची माहिती मिळावी. दिल्ली पोलीस अकादमीतही असे कार्यक्रम होतात. ऑनलाइन प्रशिक्षण वेळोवेळी घेतले जाते.

# मोबाईलचा अतिवापर विद्यार्थ्यांसाठी मारक!



न्यूयॉर्क : मोबाईलचा अतिवापर विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने अत्यंत मारक ठरत आहे. याचा थेट परिणाम विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संवादावर होत आहे. यातून शिक्षणाच्या हेतूवरच आघात होण्याची भीती निर्माण झाली आहे. त्यामुळे शाळांमधून स्मार्ट फोन हद्दपार करण्याचा सल्ला युनेस्कोने नव्या अहवालातून जगाला दिला आहे.

अलिकडे तंत्रज्ञानाच्या साथीने मुलांचे भवितव्य घडविण्याचे काम सुरू आहे. खरे तर डिजिटल शिक्षणामुळे विद्यार्थ्यांना खूप फायदा होत आहे. मात्र, याचा थेट परिणाम विद्यार्थी आणि शिक्षकांच्या संवादावर होत असल्याचे मत युनेस्कोने आपल्या अहवालात मांडले आहे. युनेस्कोच्या ग्लोबल एज्युकेशन मॉनिटरिंग रिपोर्ट या अहवालात मुलांकडून लहान वयापासून होत असलेल्या स्मार्टफोन वापरावर चिंता व्यक्त करण्यात आली.

युनोस्कोच्या शिक्षण, विज्ञान आणि संस्कृती शाखेचे म्हणणे आहे की, मोबाईलवर बंदी घातल्याने विद्यार्थ्यांच्या शिक्षणात सुधारणा होईल. यातून ऑनलाइन शोषणदेखील टाळता येईल. मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांच्या शिक्षणावर वाईट परिणाम होत असल्याचे अहवालात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय बराच वेळ मोबाइल पाहत राहिल्याने त्यांच्या मानसिक स्थितीवरही परिणाम होत आहे, असे युनेस्कोचे महासंचालक ऑड्रे अलोजा यांनी म्हटले आहे. मोबाईलचा वापर शिकण्याचा अनुभव वाढवण्यासाठी आणि विद्यार्थी आणि शिक्षकांच्या फायद्यासाठी केला पाहिजे, त्यांचे नुकसान होऊ नये. विद्यार्थ्यांच्या गरजांना प्राधान्य देतानाच शिक्षकांनाही साथ दिली पाहिजे, असेही युनोस्कोने म्हटले आहे.

संयुक्त राष्ट्राची संस्था असलेल्या युनोस्कोने डिजिटल शिक्षणात अफाट क्षमता असली तरी ते शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष संवादाची जागा घेऊ शकत नाही, असे मत व्यक्त केले. युनोस्कोने स्मार्टफोन आणि शिक्षण यासंदर्भातील अहवालात आपले परखड मत मांडले. कोणतेही तंत्रज्ञान शिक्षकांची जागा घेऊ शकत नाही. शिक्षक आणि विद्यार्थी यांच्यातील प्रत्यक्ष संवादाची जागा डिजिटल तंत्रज्ञान कधीच घेऊ शकत नाही. शिक्षण मानव केंद्रित असायला हवे. कृत्रिम बुद्धिमत्ता आणि कोणत्याही प्रकारच्या डिजिटल तंत्रज्ञानाकडे शिक्षणातील सहाय्यक घटक म्हणून पाहायला हवे, असेही युनोस्कोने म्हटले आहे.

**सायबर गुन्ह्यांपासून विद्यार्थ्यांचे रक्षण व्हावे**

डिजिटल शिक्षणाचा फायदा आहे. मात्र, त्यामुळे शिकताना वर्गामध्ये विद्यार्थी आणि शिक्षक यांच्यातील संवादामध्ये येणारा व्यत्यय टाळण्यासाठी आणि सायबर गुन्ह्यांपासून विद्यार्थ्यांचे रक्षण करण्यासाठी शाळांमधून स्मार्टफोन आणि मोबाईलवर बंदी आणली पाहिजे, असे आवाहन युनेस्कोने या अहवालात केले आहे.

**अनेक देशांकडून स्वागत**

युनेस्कोने या अहवालात केलेल्या आवाहनाचे अनेक देशांतून स्वागत होताना दिसत आहे. युनेस्कोच्या या अहवालाचे शिक्षण क्षेत्र आणि शिक्षण तज्ज्ञांनीही स्वागत केले आहे. डिजिटल एज्युकेशन आणि विद्यार्थी-शिक्षक संवाद यातून सुवर्ण मध्य काढला पाहिजे, असे मत शिक्षणतज्ज्ञांनी व्यक्त केले आहे.




# अंतराळवीर ३ दिवस अंतराळात राहणार, जाणून घ्या किती वेगळी आहे इस्त्रोची गगनयान मोहीम

इंडियन स्पेस रिसर्च ऑर्गनायझेशन (ISRO) २०२४ मध्ये गगनयान मोहीम सुरू करणार आहे. त्याची तयारी सुरू आहे. गुरुवारी, इस्रोने या मोहिमेत वापरल्या जाणाऱ्या प्रणोदन प्रणालीशी संबंधित दोन चाचण्या घेतल्या, त्या यशस्वी ठरल्या. या मोहिमेत सहभागी होणाऱ्या अंतराळवीरांना गगनौट म्हटले जाईल. इस्रोच्या अधिकृत वेबसाइटनुसार, गगनयान मोहिमेअंतर्गत, ३ गगनौटना ३ दिवस अंतराळात पाठवले जाईल आणि समुद्रात उतरवून परत आणले जाईल.

अंतराळात पृथ्वीपासून ४०० किमी उंचीवर पोहोचण्याचे गगनयानचे लक्ष्य आहे. या मोहिमेसाठी अंतराळवीरांची निवड करण्याचे काम भारतीय हवाई दलाला देण्यात आले होते. या प्रकल्पासाठी १० हजार कोटी रुपये जाहीर करण्यात आले. चांद्रयान-३ नंतर इस्रोची गगनयान मोहीम अनेक अर्थाने भारतासाठी खास असेल, जाणून घ्या गगनयान मिशन काय आहे, त्याची तयारी कशी आहे आणि ती काय आहे आणि चांद्रयान-३ सोबत त्याचे काय कनेक्शन आहे.

**गगनयान मोहिम म्हणजे काय?**

या मोहिमेद्वारे इस्रो मानवी अंतराळयान पृथ्वीच्या खालच्या कक्षेत (LEO) पाठवणार आहे. मानवांना पृथ्वीच्या खालच्या कक्षेत पाठवणे आणि त्यासाठी स्वदेशी क्षमता विकसित करणे हे इस्रोचे उद्दिष्ट आहे.

त्यासाठी मोठ्या प्रमाणावर तयारी करण्यात आली आहे. इस्रोचा दावा आहे की सुरक्षेच्या दृष्टीने या मोहिमेसाठी जाणाऱ्या अंतराळवीरांना पृथ्वीवर मिळते, तशी लाईफ सपोर्ट सिस्टीम दिली जाईल. त्यांच्या सुरक्षेसाठी विशेष काळजी घेण्यात येईल. मिशन सुरू करण्यापूर्वी अनेक चाचण्या करून त्यांची सुरक्षा तपासली जाईल. यामध्ये एअर ड्रॉप टेस्ट (IADT), पॅड ॲबॉर्ट टेस्ट (PAT) आणि टेस्ट व्हेईकल (TV) फ्लाइटचा समावेश आहे. अंतराळवीरांना घेऊन जाण्यासाठी ही मोहीम कितपत सक्षम आहे, हे या चाचण्यांचे निकालच सांगतील.

**इस्रोने ट्विट करून दिली चाचणी यशस्वी झाल्याची माहिती**

**कशी सुरु आहे मोहिमेची तयारी?**

या मोहिमेसाठी अंतराळवीरांची तयारी पूर्ण झाली आहे. इस्रोच्या चांद्रयान-३ च्या तयारीत महत्त्वाची भूमिका आहे. गगनयान कॅप्सूल अवकाशात पाठवण्याची तयारी सुरू आहे. चांद्रयान-३ लाँच व्हेईकल मॉड्यूल म्हणजेच LVM-3 (LVM-3) मधून सोडण्यात आले आहे.

आता LVM-3 ची सुधारित आवृत्ती गगनयान लाँच करण्यासाठी वापरली जाईल. यामागेही एक खास कारण आहे. वास्तविक, अंतराळवीरांसह गगनयान सोडण्यासाठी जड रॉकेटची आवश्यकता असेल, सध्या देशात LVM-3 पेक्षा जास्त विश्र्वासार्ह आणि जड रॉकेट नाही.


सध्या LVM-3 च्या यशाचा दर १०० टक्के आहे. हे बऱ्याच मानवी रेटेड सिस्टमसह सुसज्ज आहे. सोप्या भाषेत समजायचे झाले तर याचा अर्थ माणसाला अंतराळात नेत असताना रॉकेट किती प्रमाणात तयार असावे आणि कसे असावे. ते किती प्रमाणात सुरक्षित असावे? काही अडचण आल्यास रॉकेटने तेथे मिशन त्वरित थांबवावे.

इस्रोचे प्रमुख डॉ. एस. सोमनाथ यांनी गगनयानच्या प्रक्षेपण वाहनाचे रेटिंग पूर्ण झाल्याची पुष्टी केली आहे. यामध्ये वापरलेले प्रोपल्शन मॉड्युल, सॉलिड, लिक्विड आणि क्रायोजेनिक मॉड्युल्स तपासण्यात आले आहेत. आता रॉकेटच्या दुसऱ्या भागाची चाचणी सुरू आहे.

**तीन टप्प्यात पूर्ण केली जाईल ही मोहिम**

गगनयान मोहीम तीन टप्प्यात पूर्ण होणार आहे. पहिला टप्पा मानवरहित असेल. दुसऱ्या टप्प्यात हा रोबोट मिशनवर पाठवण्यात येणार आहे. निकाल आणि सुरक्षेच्या बाबींवर लक्ष ठेवून सर्व काही ठीक असल्यास तिसऱ्या टप्प्यात तीन अंतराळवीर पाठवले जातील.

# आता आरबीआयने ५०० रुपयांच्या नोटेबाबत जारी केले स्टेटमेंट, हे आहे प्रकरण



५०० रुपयांच्या नोटेबाबत एक मोठे अपडेट समोर आले आहे. RBI ने ५०० रुपयांच्या नोटेबाबत नवे स्टेटमेंट जारी केले आहे. वास्तविक, स्टार मार्क असलेल्या काही नोटा बाजारात चलनात येत आहेत. ज्यांना सोशल मीडियावर बनावट नोट म्हटले जात आहे. पण आता आरबीआयने या तारांकित नोटेबाबत स्पष्टीकरण दिले आहे. भारतीय रिझर्व्ह बँकेने म्हटले आहे की ही नोट देखील खरी आहे आणि व्हायरल पोस्टमध्ये केले जाणारे दावे पूर्णपणे खोटे आहेत. आम्ही तुम्हाला सांगतो, जेव्हापासून सरकारने २००० रुपयांच्या नोटांचे चलन बंद केले आहे, तेव्हापासून ५०० रुपयांच्या नोटांबद्दल लोकांची चिंता वाढली आहे.

त्याचवेळी तारांकित नोटा सुरू झाल्यानंतर हा विषय लोकांमध्ये झपाट्याने चर्चेचा विषय बनला होता. पण भारतीय रिझर्व्ह बँकेने एक निवेदन जारी करून लोकांचा सर्व संभ्रम दूर केला आहे. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने काय म्हटले ते पाहूया. रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाने गुरुवारी ५०० रुपयांच्या नोटांबाबत स्पष्ट केले की, स्टार (*) चिन्ह असलेली बँक नोट पूर्णपणे खरी आहे. १० ते ५०० रुपयांपर्यंतच्या अशा अनेक नोटा चलनात आहेत, ज्यामध्ये मालिकेच्या मध्यभागी ३ अक्षरांनंतर तारेचे चिन्ह आहे आणि नंतर उर्वरित अंक लिहिलेले आहेत. आरबीआयचे म्हणणे आहे की क्रमांकासह केलेले तारेचे चिन्ह सूचित करते की ती बदललेली किंवा पुनर्मुद्रित केलेली आहे म्हणजेच पुनर्मुद्रित केलेली बँक नोट आहे. ही नोट पूर्णपणे खरी आहे.

आरबीआयने सांगितले की, स्टार मार्क असलेल्या नोटा २००६ पासून चालू आहेत. या चलनी नोटा २००६ मध्ये बाजारात आल्या होत्या. सुरुवातीला फक्त स्टार चिन्ह असलेल्या १०, २० आणि ५० रुपयांच्या नोटा छापल्या जात होत्या. आता मोठ्या नोटाही छापल्या जात आहेत. जेव्हा जेव्हा अशा चलनी नोटा जारी केल्या जातात, तेव्हा त्यांच्या पॅकेटवर एक पट्टी लावली जाते. वर लिहिले आहे की पॅकेटमध्ये तारेचे चिन्ह असलेल्या नोट्स आहेत, जेणेकरून ते ओळखता येतील.

छपाईदरम्यान खराब झालेल्या चलनी नोटा बदलण्यासाठी तारांकित नोटा जारी करण्यात आल्या आहेत. या प्रकरणात, तारा चिन्ह असलेल्या नोटांचे पुनर्मुद्रण करण्यात आले आहे. आम्ही तुम्हाला सांगतो, ठइख १०० च्या नोटांचे बंडल छापते. बंडलमधील काही नोटा बरोबर छापल्या जात नाहीत. त्या नोटा बदलण्यासाठी स्टार सिरीज आणण्यात आली आहे. तसेच, या नोटांचे मूल्य इतर नोटांसारखेच आहे. जर तुम्हाला कुठेतरी स्टार सिरीज असलेली चलनी नोट मिळाली तर घाबरू नका, कारण या नोटा पूर्णपणे सुरक्षित आणि खऱ्या आहेत.

# इतर मागासवर्गीय युवक-युवतींना उद्योजक होण्यासाठी महामंडळाचा हात !!

महाराष्ट्र राज्य हे नेहमीच कल्याणकारी योजना सुरु करण्यात आणि त्या राबविण्यात अग्रेसर आहे. शेवटच्या माणसाचे कल्याण हे उद्देश ठेवून शासन काम करते. काही वर्षापूर्वी इतर मागासवर्गीय समाजाच्या उन्नतीसाठी नवीन मंत्रालय सुरु केले, महामंडळही सुरु केले. त्या महामंडळाच्या वतीने युवक-युवतींना व्यवसायीक, उद्योजक होण्यासाठी प्रोत्साहन देण्यासाठी योजना सुरु केल्या. त्या सर्व सामान्यांना कळाव्यात म्हणून म्हणून ही माहिती देत आहोत. !!

बीजभांडवल योजना : बीजभांडवल योजना राष्ट्रीयकृत बँका व जिल्हा मध्यवर्ती बँकांच्या माध्यमातुन राबवीण्यात येते. यात महामंडळाचे कर्ज २० टक्के बँकेचे कर्ज ७५ टक्के व लाभार्थीचा सहभाग ५ टक्के असतो. कर्ज सहभागांची रक्कम बॅकेने एकुण मंजुर केलेल्या कर्ज रकमेवर असते. कर्ज रक्कम मर्यादा रु.५ लक्ष. कर्ज फेडीची कालमर्यादा ५ वर्षे. व्याजदर महामंडळाच्या सहभाग रकमेवर ६ टक्के व बँकेच्या सहभाग रकमेवर प्रचलीत बँक व्याज दरानुसार. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यंत. अर्जदाराचे वय १८ ते ५० वर्षे.

थेट कर्ज योजना : थेट कर्ज योजना महामंडळामार्फत राबवण्यात येते. कर्ज मर्यादा रु. १ लक्ष. अर्जदाराचा सिबील स्कोअर किमान ५०० इतका असावा. वय १८ ते ५५ वर्षे. परत पफेडीचा कालावधी ४ वर्षे. नियीमत कर्ज परतपफेड करणाऱ्या लाभार्थींना व्याज आकारले जाणार नाही. (हप्ता मासीक रु.२०८५) तथापी थकीत कर्ज रकमेवर ४ टक्के व्याज आकारण्यात येते. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु. १ लक्ष पर्यंत.

वैयक्तीक कर्ज व्याज परतावा योजना : सदर योजना बँके मापर्फत राबवीण्यात येते. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल / संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. कुटुंबाची वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष पर्यंत. कर्ज परतपफेडीचा कालावधी बँक निकषानुसार. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र लाभार्थीस एल.ओ.आय. (Letter Of Intent) दिले जाईल. त्याआधारे बँकेकडून कर्ज मंजूर करुन घ्यावे लागेल.

गट व्याज परतावा योजना : गट व्याज परतावा योजना बँकेमार्फत राबविण्यात येते. महामंडळाच्या निकषानुसार विहीत केलेल्या वार्षिक उत्पन्न मर्यादेतील बचतगट भागीदारी / सहकारी संस्था शासन प्रमाणीत. कर्ज मर्यादा रु.१० लक्ष ते ५० लक्ष. महामंडळाच्या वेबपोर्टल / संगणक प्रणालीवर नोंदणी अनिवार्य. गटातील सर्व लाभार्थींचे खाते आधार लिंक असणे अनिवार्य. गटातील लाभार्थीचे वय १८ ते ४५ वर्षे. गटातील भागीदारांचे खाते किमान रु. ५०० कोटींच्यावर ठेवी असलेल्या व कोअर बँकींग सिस्टीम असलेल्या राष्ट्रीयकृत / शेड्युल्ड बँकेत खाते असावे. गटातील सदस्यांनी यापुर्वी महामंडळाच्या वा इतर महामंडळाच्या कोणत्याही योजनांचा लाभ घेतलेला नसावा. गटातील सर्व सदस्यांचा सिबील स्कोअर किमान ५०० असावा. कर्ज परतफेडीचा कालावधी ५ वर्षे वा कर्ज कालावधी यापैकी जो कालावधी कमी असेल तो. कर्ज रकमेचे हप्ते नियमित भरल्यास व्याज परतावा रक्कम महामंडळ नियमानुसार लाभार्थीच्या आधार लिंक खात्यात दरमहा जमा करण्यात येईल. पात्र गटास एल.ओ.आय. दिले जाईल. त्या आधारे बँकेकडुन कर्ज मंजुर करुन घ्यावे लागेल.

शैक्षणिक कर्ज व्याज परतावा योजना : शैक्षणीक कर्ज व्याज परतावा योजना बँकेमापर्फत राबवण्यात येते. बँक कर्ज रकमेवरील व्याज परतावा. देशांतर्गत व परदेशी उच्च शिक्षणासाठी रु.१० लक्ष व २० लक्ष पर्यंत अनुक्रमे. विद्यार्थीचे वय १७ ते ३० वर्षे. अर्जदाराची कौटुंबीक वार्षीक उत्पन्न मर्यादा रु.८ लक्ष. अर्जदार १२ वी ६० टक्के गुणांसह उत्तीर्ण असावा. देशांतर्गत अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन, कृषी, अन्नप्रक्रीया व पशुविज्ञान, परदेशी अभ्यासक्रम: आरोग्य विज्ञान, अभियांत्रिकी, व्यावसायीक व व्यवस्थापन बँकेने उपलब्ध करुन दिलेल्या कर्जामध्ये फक्त शैक्षणीक शुल्क, पुस्तके व साहीत्य खरेदीचा सामावेश राहील. परदेशी अभ्यासक्रमांसाठी QS(Quacquarelli Symonds) रॅकींग / गुणवत्ता निकषांनुसार संस्थेचे स्थान २०० पेक्षा आतील. परदेशी अभ्यासक्रमाकरीता पात्र परिक्षा GRE (Graduate Record), TOEFL (Test of English as Foreign Language) परीक्षा उत्तीर्ण.

पात्रतेचे निकष : लाभार्थी महाराष्ट्र राज्याचा इतर मागासवर्गीय रहीवासी असावा. तो महामंडळाचा, बँकेचा अथवा कोणत्याही वित्तीय संस्थेचा थकबाकीदार नसावा. कुटुंबातील एकाच व्यक्तीस योजनेचा लाभ घेता येईल. अर्जदाराने जो व्यवसाय निवडला असेल त्याचे त्याला ज्ञान किंवा अनुभव असावा. कर्जाच्या अटी व शर्ती महामंडळ ठरवेल त्याप्रमाणे रहातील.

**अर्जासोबत जोडवयाच्या कागदपत्रांचा तपशिल**

उत्पन्नाच्या दाखल्यासोबत सक्षम अधिकाऱ्याने अर्जदार प्रगत गटात मोडत नसल्याबाबतच्या प्रमाणपत्रांच्या साक्षांकीत प्रती. जातीचे प्रमाणपत्र, शिधापत्रिकेची प्रमाणीत प्रत, आधारकार्ड, पासपोर्ट साईज फोटो. व्यवसाय स्थळाची भाडेपावती, करारनामा, सातबारा, उतारा, लाईट बील प्रत. शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र, जन्मतारखेचा दाखला. दोन जामिनदारांचे हमीपत्र अथवा गहाणखत. स्थानिक स्वराज्य संस्थेचे व्यवसाय करण्याबाबत 'ना हरकत प्रमाणपत्र तसेच ज्या प्रयोजनासाठी कर्ज मंजुर होणार आहे त्या प्रयोजनासाठी त्याचा उपयोग करण्याबाबतचे प्रतिज्ञापत्र. तांत्रिक व्यावसायाकरिता आवश्यक असतील असे परवाने/ लायसन्स. व्यवसायाचा प्रकल्प अहवाल, लागणारा कच्चा माल, यंत्र सामुग्री इत्यादींचे दरपत्रक. महामंडळाने वेळोवेळी निर्देशीत केलेल्या कागदपत्रांचा तपशील.

महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ महामंडळाच्या इतर मागास प्रवर्गातील सुशिक्षीत व बेरोजगारासाठी कृषी, व्यापार व उद्योग सुरु करण्यासाठी खालील प्रमाणे कर्ज योजना राबविल्या जातात. योजनांच्या अधिक माहिती व इतर तपशीलासाठी महाराष्ट्र राज्य इतर मागासवर्गीय वित आणि विकास महामंडळ म. पहिला मजला, जात पडताळणी इमारत, डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, शिवनेरी गेट समोर, गुळ मार्केट, लातुर या कार्यालयाशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा, असे महाराष्ट्र राज्य इतर मागसवर्गीय वित्त आणि विकास महामंडळ लि. लातूरचे जिल्हा व्यवस्थापक पी.सी. पोहरे यांनी आवाहन केले आहे.

**कौशल्य विकास प्रशिक्षण योजना**


राज्यातील इतर मागासवर्गीय समाजातील परंपरागत व्यवसायाचे आधुनिकीकरण झालेले असल्यामुळे त्या परंपरागत व्यवसायात कार्यरत असलेल्या तसेच इतर शैक्षणिक पात्रता धारण केलेल्या इतर मागासवर्गीय समाजातील पात्र व्यक्तींना आधुनिक प्रशिक्षणाचा लाभ व्हावा तसेच कौशल्य विकास प्रशिक्षण प्रदान करुन त्यांना कौशल्यपुर्ण बनविणे व त्याव्दारे रोजगार किंवा स्वयंरोजगार उपलब्ध करुन देणे.

वयोमर्यादा १८ ते ५० वर्षे. शिक्षण १० वी उत्तीर्ण. महामंडळाच्या चडडऊ च्या वेबपोर्टलवर उमेदवाराने नांव नोंदणी करणे अनिवार्य आहे. इतर मागासवर्गीय प्रवर्गाचे जात प्रमाणपत्र, एकत्र कुटुंबाचे उत्पन्न प्रमाणपत्र (८ लक्ष पर्यंत) वयाचा दाखला, रहिवासी दाखला, आधार कार्ड अपलोड करावे लागेल. बाजारपेठेत उपलब्ध असलेल्या सेवा, नोकऱ्यांची मागणी विचारात घेऊन प्रशिक्षण अभ्यासक्रम महामंडळामार्फत निवडण्यात येईल. महामंडळाने निवड केलेल्या अभ्यासक्रमातुन उमेदवारास त्याच्या कल चाचणीच्या आधाराव अभ्यासक्रमाची निवड करता येईल. स्किल इंडीया पोर्टलवर नोंदणी केलेल्या प्रशिक्षण संस्थेमार्फत प्रशिक्षण देण्यात येईल. संपुर्ण प्रशिक्षण महामंडळामार्फत देण्यात येईल. प्रशिक्षणादरम्यान दैनंदिन हजेरी अनिवार्य राहील.

हे पत्र, मुद्रक निखील जयप्रकाश माने यांनी मालक, प्रकाशक, संपादक अशोक व्यंकटराव चिंचोले यांचे करिता चेतन ऑफसेट प्रिंटर्स, १७ शिवाजी हौसिंग सोसायटी, पद्मानगर बार्शी रोड, लातूर येथे मुद्रित केले. हे पत्रक प्रकाशक अशोक व्यंकटराव चिंचोले यांनी दै. भूकंप कार्यालय, मनपा शॉपींग कॉम्प्लेक्स गांधी चौक, लातूर, ता.जि. लातूर ४१३५१२(महा.) येथे प्रकाशीत केले. संपादक- अशोक व्यंकटराव चिंचोले ((:-२५१८२२) RNI NO. MAHMAR/2012/42770

# आरोग्य

## तंबाखू खाल्ल्याने तोंडाचाच नाही तर होऊ शकतो डोके आणि मानेचा कॅन्सरही




कर्करोग हा असा आजार आहे, जो आजही एक मोठा धोका आहे. या आजाराने मृत्यूमुखी पडणाऱ्यांची संख्याही वर्षानुवर्षे वाढत आहे. संसर्गजन्य नसलेला आजार असूनही तो साथीच्या रोगासारखा पसरत आहे. कर्करोग शरीराच्या कोणत्याही भागात विकसित होऊ शकतो. धूम्रपान आणि तंबाखूचे सेवन हे त्याच्या होण्याचे प्रमुख कारण मानले जाते. तंबाखूच्या सेवनाने फक्त तोंडाचा कॅन्सर होतो असा सर्वसाधारण समज आहे, पण तंबाखूमुळे डोके आणि मानेचा कॅन्सरही होतो, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

देशातील एकूण कर्करोगाच्या २० टक्के रुग्ण हे डोके आणि मानेचे आहेत. या दोन्ही कर्करोगाच्या प्रकरणांमध्ये ४० टक्के रुग्ण तंबाखूचे सेवन करणारे आणि धूम्रपान करणारे आहेत. या दोन कॅन्सरची बहुतेक प्रकरणे खूप उशीरा (आगाऊ) नोंदवली जातात. याचे कारण लोकांना त्यांच्या लक्षणांची जाणीव नसते. अनेक प्रकरणांमध्ये, लोक त्यांच्या आजाराकडे दुर्लक्ष करतात. प्राथमिक स्तरावर तपासणीसाठी चांगल्या सुविधा नसल्यामुळेही कर्करोग उशिरा आढळून येतो.

याबाबत एचसीजी कॅन्सर सेंटर (बंगलोर) येथील डोके आणि मान सर्जिकल ऑन्कोलॉजी विभागाचे संचालक स्पष्ट करतात की तंबाखूमध्ये नायट्रोसामाइन्स आणि पॉलीसायक्लिक सुगंधी हायड्रोकार्बन्स असतात, ज्यामुळे कर्करोगाचा विकास होतो. तंबाखू, खराब तोंडी आरोग्याव्यतिरिक्त, अल्कोहोलचे अतिसेवन देखील या कर्करोगाचा धोका वाढवते. अशा परिस्थितीत तंबाखूच्या सेवनाचा विचार करण्याची गरज आहे. विशेषतः ते लोक जे अनेक वर्षांपासून तंबाखूचे सेवन करत आहेत.

कोणती आहेत डोके आणि मानेच्या कर्करोगाची लक्षणे
चेहऱ्याची कमजोरी
सतत मान दुखणे
बोलण्यात अडचण
गिळताना त्रास
तोंडात लाल डाग जे बरे होत नाहीत
सतत डोकेदुखी
कसा करायचा बचाव

डोके आणि मानेच्या कर्करोगापासून बचाव करण्यासाठी तंबाखू आणि दारूचे सेवन कमी करावे लागेल. तसेच वयाच्या ३० वर्षांनंतर कर्करोगाची नियमित तपासणी करावी. जर तुम्हाला कॅन्सरशी संबंधित काही लक्षणे दिसत असतील, तर त्याची तपासणी करा. वेळेवर चाचणी करून घेतल्यास, सुरुवातीच्या टप्प्यातच कर्करोग सहज शोधता येतो. त्यामुळे भविष्यात गंभीर धोका टळू शकतो.

## डोळ्याच्या फ्लूमुळे देखील येऊ शकते अंधत्व, ही लक्षणे दिसल्यास त्वरित करा उपचार




देशाच्या अनेक भागांमध्ये डोळ्यांच्या फ्लूच्या आजाराची प्रकरणे सातत्याने वाढत आहेत. विशेष म्हणजे रुग्णालयांमध्ये या आजाराच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. डोळ्यांच्या फ्लूची इतकी प्रकरणे समोर येण्याची गेल्या अनेक वर्षांतील ही पहिलीच वेळ आहे. विशेष म्हणजे जर कुटुंबातील एका व्यक्तीला हा संसर्ग झाला असेल, तर सर्व सदस्यांना याची लागण होत आहे. लहान मुले, तरुण आणि वृद्ध सर्वांनाच या संसर्गाने ग्रासले आहे. हा आजार दिल्ली-एनसीआर, उत्तर भारतातील अनेक राज्यांपासून गुजरातपर्यंत पसरत आहे.

पावसाळ्यात तापमान कमी होऊन आर्द्रता वाढते, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे. यामुळे अनेक प्रकारचे बॅक्टेरिया वाढू लागतात, ज्यामुळे डोळ्याच्या फ्लूसारखे आजार होतात. बहुतेक प्रकरणांमध्ये, डोळ्यांचा फ्लू काही दिवसात बरा होतो, परंतु लक्षणे दीर्घकाळ टिकून राहिल्यास आणि उपचार न केल्यास, यामुळे डोळ्यांना देखील नुकसान होऊ शकते. अशा स्थितीत डोळ्यांचा हा आजार हलकासा घेऊ नये.

**एम्समध्ये दररोज येत आहेत १०० हून अधिक रुग्ण**

एम्स नवी दिल्लीच्या आरपी सेंटरचे प्रमुख सांगतात की, विभागाच्या ओपीडीमध्ये डोळ्यांच्या फ्लूचे १०० हून अधिक रुग्ण दररोज येत आहेत. बहुतेक लोकांमध्ये, हा संसर्ग काही आठवड्यांत बरा होतो, परंतु जर त्यात बॅक्टेरियाचा संसर्ग असेल तर लक्षणे गंभीर असू शकतात. अशा परिस्थितीत, लोकांना वेदना किंवा डोळे लालसर झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेण्याचा सल्ला दिला जातो.

**निष्काळजी होऊ नका**

दिल्लीतील सर गंगाराम हॉस्पिटलमधील नेत्र विभागाचे एचओडी प्रोफेसरने सांगितले की डोळ्यांच्या फ्लूच्या बाबतीत स्वत: ची औषधोपचार टाळली पाहिजे. या परिस्थितीत डॉक्टरांचा सल्ला घेणे आवश्यक आहे. डोळयांतील वेदना आणि लालसरपणा वाढत आहे, असे वाटत असेल, तर हे संक्रमण गंभीर स्वरूप धारण करत असल्याची चिन्हे आहेत. या स्थितीत तुम्ही रुग्णालयात जावे.

ज्या लोकांना आधीच डोळ्यांचा कोणताही आजार आहे त्यांनी अधिक सावध राहण्याची गरज आहे. अशा लोकांसाठी डोळ्यांच्या बाबतीत कोणतीही निष्काळजीपणा धोकादायक ठरू शकतो. यामुळे प्रकाश कमी होण्याचा धोका असतो. काही लोक घरगुती उपचारांमध्ये देखील गुंतलेले असतात, परंतु डोळ्याच्या फ्लूच्या बाबतीत असे करणे टाळले पाहिजे. या समस्येमध्ये, आपण डोळ्याच्या डॉक्टरांचा सल्ला घ्यावा.

**डोळा फ्लू वाढण्याची कारणे शोधणे आवश्यक**


एपिडेमियोलॉजिस्ट सांगतात की, यावेळी डोळ्यांच्या फ्लूच्या रुग्णांमध्ये विक्रमी वाढ होत आहे. पूर्वीच्या तुलनेत जवळपास तिप्पट प्रकरणे समोर येत आहेत. त्याची कारणे जाणून घेणे आवश्यक आहे. या आजाराच्या विषाणू किंवा बॅक्टेरियामध्ये काही बदल झाला आहे का, हे तपासावे लागेल. यासोबतच लोकांना या संसर्गाची माहिती द्यावी लागेल. याचे कारण असे की डोळ्यांच्या फ्लूची लक्षणे आणि प्रतिबंध याबाबत अनेकांना योग्य माहिती नसते.

या लक्षणांकडे दुर्लक्ष करू नका
तीव्र डोळा दुखणे
डोळ्यातून सतत पाणी येणे
डोळे लाल होणे
खूप खाज सुटणे

## कॅल्शियमचे महत्त्व


माणूस वृद्धत्वाकडे झुकायला लागला की, त्याची हाडे नाजूक व्हायला लागतात आणि छोट्या-मोठ्या अपघाताने फ्रॅक्चर होणे असे प्रकार घडायला लागतात. शरीरामध्ये कॅल्शियम कमी असले की हाडे लवकर कमकुवत होतात आणि असे प्रश्न निर्माण होतात. म्हणून कॅल्शियमचा पुरवठा शरीराला भरपूर झाला पाहिजे, असे डॉक्टर सांगतात. वयाच्या ५० व्या वर्षापर्यंत शरीराला कॅल्शियम मिळत आहे की नाही, याचा कधी विचार केलेला नसतो आणि ५० व्या वर्षानंतर त्याचे परिणाम जाणवायला लागतात. मग लोक जागे होतात आणि टॉनिक, पोषक आहारद्रव्ये यांच्यासोबतच कॅल्शियमही दिले जाते. आता ही गोष्ट सर्वांना माहीतच झालेली आहे.

ऑस्टिओपोरोसिस हा विकार वृद्धत्वात टाळण्यासाठी शरीराला कॅल्शियम मिळणे आवश्यक आहे, हे लोकांच्या मनावर बिंबले आहे. मात्र आता याबाबतीत सुद्धा तज्ज्ञांमध्ये वेगळा अनुभव यायला लागला आणि त्यांनी याबाबतीत थोडा सावधानतेचा इशारा दिला आहे.




भरपूर कॅल्शियम म्हणजे मजबूत हाडे, असे काही समीकरण तयार करता येणार नाही. तेव्हा हाडे मजबूत करण्यासाठी कोणी अतिरेकी कॅल्शियम घेत असेल तर त्यांनी त्यापासून सावध राहिले पाहिजे. काही वेळा मर्यादेपेक्षा अधिक कॅल्शियमचा पुरवठा शरीराला झाला तर उलट हाडांचे नुकसान होऊ शकते, असा इशारा त्यांनी दिला आहे. या संबंधीचे शास्त्र थोडे समजून घेतले पाहिजे. ऑस्टिओपोरोसिस हा कॅल्शियमच्या कमतरतेचा विकार नाही. तेव्हा केवळ कॅल्शियम घेतल्याने हाडे मजबूत होतील आणि वृद्धावस्थेमध्ये ऑस्टिओपोरोसिसपासून सुटका होईल असे काही मानता कामा नये. ऑस्टिओपोरोसिस हा फार गुंतागुंतीचा विकार आहे. त्यामागे व्यायामाचा अभाव, दीर्घकाळचा शरीराचा दाह, जीवनसत्त्वाचा अभाव, सूक्ष्म द्रव्यांचा अभाव आणि पोषण विषयक असमतोल हीही ऑस्टिओपोरोसिसची कारणे आहेत. तेव्हा हे लक्षात घेतले म्हणजे कॅल्शियमच्या गोळ्या खाल्ल्याने ऑस्टिओपोरोसिस टळेल, हा गैरसमज असल्याचे समजेल. हे टाळायचे असेल तर ड जीवनसत्त्वाचा पुरवठा करणारा आहार घेतला पाहिजे. शरीराला थोडे उन्हातून फिरवले पाहिजे. उन्हातून मुबलक प्रमाणात ड जीवनसत्त्व मिळते.

## लस उपलब्ध असूनही, हिपॅटायटीस बी का आहे धोकादायक




आज जगभरात जागतिक हिपॅटायटीस दिवस साजरा केला जात आहे. हिपॅटायटीस आजाराबाबत लोकांना जागरूक करणे हा त्याचा उद्देश आहे. हा एक दशक जुना आजार आहे, तरीही दरवर्षी या रोगाच्या लाखो केसेस समोर येतात. या आजारापासून बचाव करण्यासाठी लस देखील उपलब्ध आहे, परंतु तरीही ती खूप घातक आहे. या आजारामुळे यकृत पूर्णपणे खराब होऊ शकते. कर्करोग होण्याचाही धोका असतो.

लस असूनही हा आजार इतका धोकादायक का आहे हा मोठा प्रश्न आहे. या प्रश्नाचे उत्तर जाणून घेण्याआधी हिपॅटायटीस म्हणजे काय आणि कधी होतो हे जाणून घेऊया.

**काय आहे हिपॅटायटीस**

हिपॅटायटीस हा यकृताचा आजार आहे. सुरुवातीला यकृतावर सौम्य सूज येते. हा आजार विषाणूमुळे किंवा यकृताला झालेल्या नुकसानीमुळे होतो. हा आजार व्हायरल हेपेटायटीसपासून सुरू होतो. हा त्याचा सर्वात सामान्य प्रकार आहे. हे अनेक विषाणूंपैकी एकामुळे होते. हिपॅटायटीसचे विषाणू -, इ, उ, ऊ आणि ए असे पाच प्रकार आहेत. यापैकी हिपॅटायटीस इ आणि उ हे जास्त धोकादायक आहेत. यामध्ये मृत्यूचे प्रमाणही जास्त आहे.

**यकृतावर हल्ला करते शरीराची रोगप्रतिकारक शक्ती**

फोर्टिस हॉस्पिटलमधील गॅस्ट्रोएन्टेरोलॉजी आणि हेपॅटोबिलरी सायन्सेस विभागातील डॉक्टर स्पष्ट करतात की जर हिपॅटायटीसवर वेळेवर उपचार केले गेले नाहीत, तर तो प्राणघातक ठरू शकतो. या आजाराचे अनेक प्रकार आहेत. यामध्ये अल्कोहोलिक हिपॅटायटीस हा अल्कोहोलच्या अतिसेवनामुळे होतो. यामध्ये ऑटोइम्यून हिपॅटायटीस अतिशय धोकादायक आहे. हा एक जुनाट आजार आहे, ज्यामध्ये शरीराची रोगप्रतिकारक शक्ती यकृतावर हल्ला करते.

हिपॅटायटीस आजारामुळे यकृतालाही पूर्णपणे नुकसान होऊ शकते. काही प्रकरणांमध्ये, यामुळे यकृत निकामी आणि यकृताचा कर्करोग देखील होऊ शकतो. हे कमकुवत प्रतिकारशक्ती असलेल्या लोकांना सहजपणे बळी बनवते. हे टाळण्यासाठी, लक्षणे वेळेवर ओळखणे आणि उपचार करणे आवश्यक आहे.

काय आहेत लक्षणे
वारंवार कमी ताप
भूक न लागणे
सतत ओटीपोटात दुखणे
नेहमी थकवा
गडद मूत्र
त्वचा पिवळसर होणे

**लस असूनही का धोकादायक आहे हा आजार ?**

तज्ज्ञ डॉक्टर सांगतात की हिपॅटायटीस बी साठी एक लस आहे. मुलाच्या जन्मानंतर, ही लस १० वर्षांपर्यंत दिली जाऊ शकते. पुढील दोन डोस पहिल्या डोसच्या ६ महिन्यांच्या आत घेतले जाऊ शकतात. प्रौढांनाही ही लस दिली जाऊ शकते. हिपॅटायटीस बी या लसीमुळे बऱ्याच प्रमाणात प्रतिबंध होतो, परंतु बहुतेक लोकांना या लसीबद्दल माहिती नसते.

यातील लोक लसीकरणापासून वंचित राहून आजाराच्या विळख्यात सापडले आहेत. काही प्रकरणांमध्ये, लोक लक्षणांकडे देखील लक्ष देत नाहीत. त्यामुळे हिपॅटायटीसचा आजार यकृत खराब करत राहतो आणि हा आजार आढळून आल्यावर परिस्थिती अत्यंत गंभीर बनते.

## रडण्याचे काय फायदे आहे? जाणून घ्या



रडणे ही मानवाची एक सामान्य क्रिया आहे, जी अनेक वेगवेगळ्या भावनांमुळे उत्तेजित होते. पण तुम्ही कधी विचार केला आहे का की माणसं का रडतात? संशोधकांना संशोधनात असे आढळून आले आहे की, रडण्याने आपले शरीर आणि मन या दोन्हींचा फायदा होतो.अनेक गोष्टींवर रडायचे असेल तर पुरुष ते रडणे रोखतात, पण मुले आणि महिला रडायला लागतात,अनेकांना सहज रडायला येते. कारण ते जास्त भावनिक असतात. रडणे देखील चांगले आहे. थोडा वेळ रडल्यानंतर तुम्हाला हलके वाटू लागते. चला तर मग जाणून घेऊया रडण्याने तुमच्या आरोग्यासाठी कोणते फायदे आहेत. रडण्याचे फायदे जाणून घ्या.

१. रडल्याने पॅरा-सिम्पेथेटिक मज्जासंस्था सक्रिय होते, जे मन शांत करते आणि पचन सुधारते

२. लाइसोझाइम नावाचा पदार्थ अश्रूंमध्ये आढळतो. हे डोळ्यांतील बॅक्टेरिया काढून टाकून डोळ्यांना शांत करते.

३. रडल्याने शरीरातील एंडोर्फिन, ल्युसीन एन्कार्फेलिन, प्रोलॅक्टिन सारख्या घटकांची पातळी कमी होते, ज्यामुळे तणाव कमी होण्यास मदत होते.

४. रडल्याने तुमचे दुःख कमी होऊन आराम मिळतो. रडल्यानंतर तुम्हाला हलके वाटते आणि आनंदी वाटते.

५. जेव्हा दुःखी असता तेव्हा नैराश्यामुळे शरीरात हानिकारक घटक तयार होतात. जेव्हा आपण रडतो तेव्हा हे घटक शरीरातून बाहेर पडतात.

६. उच्च रक्तदाबाच्या रुग्णांसाठी रडणे फायदेशीर आहे, ते रक्तदाब सामान्य करण्यासाठी उपयुक्त आहे.

७. रडल्याने मनःस्थिती सुधारते आणि भावना संतुलित होतात.

८. रडल्याने दुःखावर मात करण्यात मदत होते आणि शरीरातील वेदना कमी होतात.



## पिंडखजूराचे अवश्य सेवन करावे

Pindakhjur Must be consumed पिंडखजूर थंडीत संपूर्ण भारतात आरामात उपलब्ध राहतात. याचे वृक्ष ३० ते ४० फूट लांब, ३ फूट चौरस हलक्या भुरा रंग व पान १० ते १५ फूट लांबीचे असतात. हे एक ते दीड इंच लांब, अंडकार व गडद लाल रंगाचा फळ असतो. पिंडखजूरच्या आतील बिया फारच कडक असतात.

लीव्हर : यकृताच्या कार्यासाठी आवश्यक पाचक रसाला वाढवण्यात मदत करतो.

बुद्धकोष्ठता : फायबरची अधिकतेमुळे बुद्धकोष्ठता दूर करतो.

वजन वाढवतो : कार्बोहायड्रेड व कॅलोरीची मात्रा जास्त असल्यामुळे वजन वाढण्यात मदत मिळते.

तंत्रिका तंत्र : साखरेची मात्रा जास्त असल्यामुळे मेंदू क्रियाच्या क्षमता वाढवण्यात सहायक असते.

मिनरल : आयरन व कॅल्शियमची अधिक मात्रा असल्याने शरीरात रक्त वाढवण्यात व हाडांना मजबूत करण्यात सहायक असतो. थकवा व चक्कर दूर करतो. तसेच संक्रामक रोग, जसे सर्दी व तापापासून बचाव करतो.

## कोणत्या विषाणूमुळे झपाट्याने पसरत आहे आय फ्लू? एम्सच्या संशोधनात मोठा खुलासा



देशातील अनेक राज्यांमध्ये डोळ्यांच्या फ्लूचे रुग्ण वाढत आहेत. मागील वर्षांच्या तुलनेत अनेक पटींनी अधिक प्रकरणे नोंदवली जात आहेत. या आजाराची प्रकरणे एवढ्या वेगाने का वाढत आहेत, हा मोठा प्रश्न होता. ज्याचे उत्तर आता सापडले आहे. एम्स नवी दिल्लीच्या संशोधनात असे आढळून आले आहे की एडेनोव्हायरसमुळे डोळ्यांच्या फ्लूचे रुग्ण खूप वाढत आहेत. एडेनोव्हायरस खूप धोकादायक आहे. त्यामुळे डोळे लाल होतात आणि संसर्गही होतो. या विषाणूचा फुफ्फुसांवरही परिणाम होतो.

एम्सच्या संशोधनात ८० टक्के डोळ्यांच्या फ्लूच्या रुग्णांमध्ये एडेनोव्हायरस आढळून आला आहे. हा विषाणू डोळ्यांमध्ये संसर्गास कारणीभूत ठरतो आणि कमकुवत प्रतिकारशक्ती असलेले याला सहज बळी पडतो. एडिनोव्हायरसमुळे लक्षणे देखील गंभीर असू शकतात. डोळयांशिवाय हा विषाणू फुफ्फुसांनाही हानी पोहोचवू शकतो. हे नवीन नसले तरी यावेळी लोकांच्या डोळ्यांवर आघात करत आहे. देशभरात झालेल्या पावसामुळे तापमानात वाढलेल्या आर्द्रतेमुळे हा विषाणू चांगलाच सक्रिय झाला आहे. यामुळेच डोळ्यांच्या फ्लूचे रुग्ण वाढत आहेत.

**एम्समध्ये आलेल्या रुग्णांची करण्यात आली तपासणी**

एम्सच्या आरपी सेंटरचे प्रमुख डॉ. जेएस तितियाल यांनी दिलेल्या माहितीनुसार, विभागात येणाऱ्या डोळ्यांच्या फ्लूच्या रुग्णांचे नमुने घेण्यात आले. यामध्ये डोळ्यांचा फ्लू पसरवणाऱ्या विषाणूच्या स्ट्रेनमध्ये काही बदल झाला आहे की नाही हे तपासण्यात आले. ८० टक्के रुग्णांना एडिनोव्हायरसची लागण झाल्याचे तपासणीत आढळून आले आहे. उर्वरित रुग्णांमध्ये बॅक्टेरियाचा संसर्ग आढळून आला आहे. विभागाच्या ओपीडी आणि इमर्जन्सीमध्ये दररोज रुग्ण येत आहेत. गेल्या दिवशी १०० हून अधिक रुग्ण आपत्कालीन स्थितीत आले होते. लोकांना डोळा फ्लूची लक्षणे दिसल्यास सावधगिरी बाळगण्याचा सल्ला दिला जातो.

**दिवसेंदिवस वाढत आहे रुग्णांची संख्या**

रुग्णालयांमध्ये फ्लूच्या रुग्णांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे. दिल्लीतील लोकनायक हॉस्पिटल, जीटीबी, संजय गांधी हॉस्पिटलसह एम्सच्या ओपीडीमध्ये दररोज १०० हून अधिक डोळ्यांच्या फ्लूचे रुग्ण येत आहेत. डोळ्यांच्या फ्लूपासून बचाव करण्यासाठी प्रत्येकाने सतर्क राहणे गरजेचे असल्याचे डॉक्टरांचे म्हणणे आहे.

**कसा टाळावा डोळ्यांचा फ्लू**

दिल्लीतील सर गंगाराम हॉस्पिटलमधील नेत्र विभागाचे एचओडी प्रोफेसर स्पष्ट करतात की डोळ्यांच्या फ्लूपासून बचाव करण्यासाठी अनेक सावधगिरी बाळगणे आवश्यक आहे. बाधित व्यक्तीच्या रुमालाला आणि टॉवेलला हात लावू नका. ठराविक अंतराने हात धुत राहा. पुन्हा पुन्हा डोळ्यांना स्पर्श करू नका. दिवसातून दोन ते चार वेळा डोळे धुत रहा. डोळ्यातून पाणी येत असेल तर स्वतःहून उपचार करू नका. या प्रकरणात डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## कु. नेहा हंचनाळे हिची महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाने घेतली शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी

लातूर : महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, लातूर येथील अकरावी विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असलेली कु. नेहा हंचनाळे हिची महात्मा बसवेश्वर महाविद्यालयातील भौतिकशास्त्र व संगणक शास्त्र विभाग प्रमुख प्रा. वनिता पाटील यांनी पुढील शिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेतली आहे. कु. नेहा हंचनाळे ही सध्या महात्मा बसवेश्र्वर महाविद्यालयात अकरावी विज्ञान शाखेमध्ये शिक्षण घेत असून तिची क्रॉप सायन्सची संपूर्ण शैक्षणिक फी प्रा. वनिता पाटील आणि प्रभारी प्राचार्य डॉ. संजय गवई यांनी भरली तर श्रीपाद ढगे यांनी तिला महाविद्यालयाचा गणवेश मोफत दिला.


लातूर
# भूकंप
http://epaper.dainikbhukamp.com


## गिरणी कामगारांच्या घराचे प्रश्न सोडवण्याची कालमर्यादा निश्चित करा

मुंबई : महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कामाच्या निमित्ताने मुंबईत आलेले गिरणी कामगार हे मुंबईचे खरे निर्माते आहे, त्यांच्या हक्काच्या घराचा प्रश्र्न सुटावा यासाठी शासनाने कालमर्यादा निश्चित करावी आणि सकारात्मक रित्या हा प्रश्न सोडवावा असे आवाहन काँग्रेस विधिमंडळ पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात यांनी सभागृहात केले.

थोरात म्हणाले, पृथ्वीराज चव्हाण मुख्यमंत्री असतानाच्या काळात हा प्रश्र्न प्रामुख्याने समोर आला होता. महसूल मंत्री या नात्याने हा प्रश्न हाताळायची जबाबदारी माझ्याकडे होती, आम्ही या प्रश्नात खूप काम केले, पुढे गेलो आणि अनेक प्रश्न मार्गी लावले. गिरणी कामगारांच्या प्रश्र्नाकडे केवळ राजकारण म्हणून बघू नये. महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यातून कामा धंद्याच्या निमित्ताने ही लोक मुंबईत आली, स्थिरस्थावर झाली, त्यांनी मुंबई उभी करण्यात हातभार लावला. त्यामुळे हा प्रश्न सोडविण्यासाठी कालमर्यादा निश्चित केली पाहिजे.





## कन्यादान प्रथा बंद करा; जिल्हाधिकारी यांना निवेदन

लातूर : मुलगी,लेक ही दान करण्याची वस्तू नाही त्यामुळे विवाहात कन्यादान हा महिला जातीवर अन्याय करणारा व अपमानास्पद शब्द आणि प्रथा असल्याने या शब्दाला पर्याय शब्द द्यावा किंवा या कन्यादान प्रथेला फाटा द्यावा अशी मागणी लातूरच्या माजी नगरसेविका तथा स्थायी समिती सदस्या सौ.रागिणी यादव आणि शिष्टमंडळाने लातूरच्या नवनियुक्त जिल्हाधिकारी सौ.वर्षा ठाकूर-घुगे यांच्याकडे एक निवेदनाद्वारे केली आहे.तसेच सौ.रागिणी यादव यांनी यापूर्वी महिलांच्या ज्या वस्तु आहेत त्यात बांगडया, साडी ,चोळी बुरखा या निषेध म्हणून अनेक आंदोलनात वापरले जातात,त्या वापरू नये यासाठी निवेदन दिले होते त्याचे देखील स्मरण यावेळी करून देण्यात आले.

आपल्या हिंदू संस्कृतीत व सर्व धर्मात मुलगी ही लक्ष्मी मानली जाते.तसेच विवाहापूर्वी माहेर आणि विवाहानंतर सासरी अश्या दोन्ही घरी प्रकाश देते असे आपण कालांतराने मानतो.परंतू कालांतराने चालत आलेल्या कांही प्रथा या मुलीवर व महिला जातीवर अन्यायकारक आहेत अशी भावना महिला वर्गात प्रामुख्याने आज आहे,मात्र त्यावर कोणी बोलण्याचा पुढाकार घेत नाही.पूर्वी शिक्षण व जनजागरणाचा अभाव असल्याने कांही प्रथा,बाबी चालल्या,ज्या सहन केल्याखेरीज पर्याय नव्हता.परंतु आज सर्व क्षेत्रात महिला ही आघाडीवर असल्याने व पुरुष-महिला हा भेदभाव न करण्याचे शासनाचे धोरण असल्याने महिलांना ओझे म्हणून पाहणे हे कोठे तरी थांबले पाहिजे.तसेच पूर्वीपासून आजपर्यंत चालत आलेल्या कांही अन्यायकारक प्रथा देखील थांबल्या पाहिजेत किंवा त्याला फाटा दिला पाहिजे.ज्यात विवाहात कन्यादान म्हणून एक प्रथा आहे.ज्यात दान हा शब्द वापरला जातो.खरं तर मुलगी ही दान असू शकत नाही.कारण जी दानाची व्याख्या आहे त्यात ती बसत नाही,तरी तीला दान समजणे आणि सर्व समाजासमोर त्याचे दान करणे म्हणजे हा एकप्रकारे तिच्यावर आणि महिला जातीवर मोठा अन्यायच आहे किंबहुना तिचा अपमान आहे.कारण मुलीचा जेवढा हक्क सासरी असतो तेवढाच हक्क माहेरी पण असतो.त्यामुळे मुलीला दान समजणे हे बंद झाले पाहिजे व तिला सन्मानाने दोन्ही घरी ठेवण्याची गरज आहे.किंवा मग जी वर्षानुवर्ष चालत आलेली कन्यादानाची प्रथा आहे तिचे नाव बदलण्याची किंवा ती प्रथाच बंद करण्याची किंवा या प्रथेला फाटा देण्याची मागणी बुधवारी निवेदन द्वारे करण्यात आली आहे.तसेच कांही दिवसापूर्वी सौ.रागिणी यादव यांनी लातूरच्या जिल्हाधिकारी यांच्यासह मुख्यमंत्री,उपमुख्यमंत्री, राज्यपाल यांच्याकडे निवेदनाद्वारे महिलांचे जे आभूषण आहेत ते साडी,चोळी बांगड्या आणि बुरखा ह्या आपल्याकडे आंदोलनात आणि निषेध म्हणून सर्रास वापरले जातात ते देखील बंद व्हावे अशी मागणी केली होती याचीही आठवण यावेळी रागिणी यादव आणि शिष्टमंडळाने मा.जिल्हाधिकारी यांना करून दिली.याप्रसंगी या शिष्टमंडळात सौ जयश्री भुतेकर,सौ.आशा रामचंदानी, सौ.काशीबाई हांडे, सौ.देवकन्या राऊत,सौ.कोमल सावंत,सौ.मीना कुकर आदी उपस्थित होत्या.

# तोंड उघडण्याच्या लाईव्ह शस्त्रक्रियेत डॉक्टरांना यश

लातूर : सुपारी, गुटखा, तंबाखू या पदार्थांचे दिर्घकाळ सेवन केल्याने तोंड उघडत नसलेल्या एका ४२ वर्षीय रुग्णांवर लोणी, अहमदनगर येथील राष्ट्रीय मुख शल्य परिषदेत लातूर येथील एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख शल्य तज्ञ डॉ. गोविंद चांगुले यांनी तोंडाची उघड-झाप करण्याच्या गुंतागुंतीच्या शस्त्रक्रियेचे देशभरातील ९०० मुख शल्य तज्ञांच्या समक्ष लाईव्ह सादरीकरण करुन शस्त्रक्रिया यशस्वी केली.

अहमदनगर येथील एक ४२ वर्षीय व्यक्तीने गुटखा, सुपारी व तंबाखू या पदार्थाचे दीर्घकाळ सेवन केल्यामुळे त्याचे तोंड केवळ पाच मिलीमिटर एवढेच उघडत होते. त्यामुळे त्यांना दैनंदिन अन्न, टिखट पदार्थ प्राशन करण्यास त्रास होत होता. तोंड अतीशय कमी प्रमाणात उघडत असल्याने व औषधोपचाराने आजार आटोक्यात येत नसल्यामुळे प्रवरा ग्रामीण दंत महाविद्यालयातील मुख शल्य तज्ञांनी शस्त्रक्रिया करून घेण्यास सांगितले.

दम्यान प्रवरा आरोग्य अभिमत विद्यापीठ, लोणी, अहमदनगर येथील ग्रामीण दंत महाविद्यालयातील मुख शल्य विभाग व भारतीय मुख शल्य तज्ञ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवशीय राष्ट्रीय मुख शल्य परिषदेत (ता. १९ जुलै) रोजी डॉ. गोविंद चांगुले यांनी देशभरातून आलेल्या ९०० मुख शल्य तज्ञ, पद्व्युत्तर विद्यार्थी यांच्या समोर आजारग्रस्त रुग्णाच्या तोंडात शस्त्रक्रिया करून आतील भागातील कडक झालेले स्नायु शिताफीने मोकळे करुन व त्या ठिकाणी नाकाच्या दोन्ही बाजुंची चमडी (नासोलेबीयल फ्लॅप) काढून त्या ठिकाणी लावून ही लाईव्ह शस्त्रक्रिया यशस्वीपणे पुर्ण केली. शस्त्रक्रियेनंतर रुग्णाचे ४५ मिलीमीटर अर्थात तोंडात चार बोटे जातील इतके तोंड उघडण्यात आले. या शस्त्रक्रियेसाठी मुख शल्य तज्ञ डॉ. सतीश खर्डे यांनी सहाय्य केले तर



भूलतज्ञ म्हणून डॉ. विनायक डोंगरे यांनी काम पाहिले.

तसेच या परिषदेत एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील मुख शल्य तज्ञ डॉ. अमोल डोईफोडे, डॉ. गोविंद चांगुले यांनी परिक्षक म्हणूनही काम पहिले तर डॉ. पुनम नागरगोजे यांनी मुख शल्य या विषयावर शोधनिबंध सादर केला. त्याचबरोबर मुख शल्य पदव्युत्तर अभ्यासक्रमाचे विद्यार्थी डॉ. वर्षा जाजू यांनी शोधनिबंध सादर केला. डॉ. सानिका मेंडकी यांनी पोस्टर सादर केले तर डॉ. ज्ञानेश्र्वर साखरे, डॉ. शुभम भेले यांनी या परिषदेत सहभाग नोंदवला.

या परिषदेसाठी कार्यकारी संचालक डॉ. हनुमंत कराड, प्राचार्य डॉ. सुरेश कांगणे, उप प्राचार्य डॉ. यतिशकुमार जोशी यांनी प्रोत्साहन दिले.गुटखा, सुपारी, तंबाखू, पानमसाला, मावा, जर्दा सतत चघळत राहिल्यामुळे तोंडातील स्नायूंची लवचिकता संपुष्ठात येवून ओरल सबम्युकस फाब्रोसिस हा आजार जडतो. त्यामुळे तोंडाची उघड-झाप करण्यास अडचणीचे होते. अन्न प्राशन करण्यास, तिखट खाण्यास त्रास होतो. जळजळ होणे, आग होणे अशा अडचणी उद्भवतात. या आजारावर प्रथमावस्थेत तोंडाचे व्यायाम व औषधोपचार करुन व व्यसन थांबवून आजाराचा प्रादूर्भाव रोखता येतो. वेळीच उपचार न घेतल्यास या आजाराचे कर्करोगात रूपांतर होण्याचा संभाव्या धोका उद्भवू शकतो. मात्र आजाराचा प्रादूर्भाव वाढल्यानंतर शस्त्रक्रिया हा एकमेव पर्याय उरतो.

## दयानंद विधी महाविद्यालयात जे.एम.एफ.सी. क्रॅश कोर्स

लातूर : महाराष्ट्रात शैक्षणिक क्षितिजावर आपल्या उज्ज्वल शैक्षणिक कार्याची अम्लान मुद्रा उमटविण्याचा दयानंद शिक्षण संस्थेने न्यायालयीन क्षेत्रात प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी आज एका मार्गदर्शनपर कार्यक्रमाचे आयोजन केले होते. प्रस्तुत मार्गदर्शनपर कार्यक्रम हा दयानंद विधी मार्गदर्शन कक्षा मार्फत आयेजिण्यात आला होता.प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी पदासाठी पूर्व तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांना अल्प वेळेत परिपूर्ण तयारी कशी करावी, या विषयावर सखोल मार्गदर्शन उपलब्ध व्हावे म्हणून दयानंद मार्गदर्शन कक्षा (Dayanand Law Guidance Cell) तर्फे विधीतज्ज्ञांच्या वाख्यानांचे आयोजन केले होते. यामध्ये प्रामुख्याने लातूर जिल्हा व सत्र न्यायालयातील निष्णात विधीज्ञ मा. प्रशांत मरळे, विधीज्ञ मा. अजिंक्य निकम, प्रा. ॲड. स्वाती पाटील, प्रा. ॲड. पठाण मुस्तफा यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात प्रमुख व्याख्याते म्हणून उपस्थित झालेल्या मार्गदर्शक विधीज्ञांनी परीक्षेची तयारी कशी करावी, अभ्यास करताना कोणकोणत्या बाबींची खबरदारी घ्यावी व परीक्षेला कसे सामोरे जावे, याविषयी तपशीलवार मार्गदर्शन केले.मंचावर प्रमुख अतिथींबरोबर दयानंद विधी महाविद्यालयाच्या प्राचार्या मा.डॉ. पूनम नाथानी व दयानंद मार्गदर्शन कक्षाचे समन्वयक मा. प्रा. डॉ. एन. डी. जाधव हे उपस्थित होते.

दयानंद विधी महाविद्यालयातील करिअर गायडंस सेल द्वारा विधी व न्याय क्षेत्रात पात्र होऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मार्गदर्शनास्तव आयोजिण्यात आलेल्या या समारंभात प्रारंभी दयानंद विधी महाविद्यालयाच्या कुशल प्राचार्या डॉ. पूनम नाथानी यांच्या शुभहस्ते पाहुण्यांचा यथोचित सत्कार करण्यात आला. दयानंद मार्गदर्शन कक्ष ( अूरपरपव त्र्रीळवरपलश उशश्रश्र ) समन्वयक प्रा. डॉ. एन. डी. जाधव यांनी कार्यक्रमाच्या आयोजनामागील दयानंद शिक्षण संस्थेची प्रधान भूमिका व मार्गदर्शन कक्षाचे उद्दिष्ट यांवर अभ्यासपूर्ण प्रास्ताविक केले. विद्यार्थ्यांना न्याय क्षेत्रात उत्तमरीतीने यशस्वी होता यावे म्हणून आयोजिण्यात आलेल्या या मार्गदर्शनपर कार्यक्रमात अभ्यासपूर्ण व सखोल माहिती देऊन विद्यार्थ्यांचे उद्बोधन केल्याबद्दल प्रा. स्वाती पाटील यांनी त्यांचे विशेष आभार मानले. दयानंद शिक्षण संस्थेच्या संचालक मंडळाच्या सततच्या मार्गदर्शन व सहकार्यामुळे सदर कार्यक्रम यशस्वी झाला. विद्यार्थ्यांसाठी आयोजिलेल्या या विशेष मार्गदर्शनपर समारंभासाठी स्पर्धक विद्यार्थी, सर्व प्राध्यापक, कर्मचारी वर्ग तथा निमंत्रित मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दयानंद शिक्षण संस्थेद्वारा नित्य आयोजिण्यात येणाऱ्या व नाममात्र शुल्कात विद्यार्थ्यांना प्रवेश देऊन सुयोग्य मार्गदर्शन उपलब्ध करून देणाऱ्या या उपक्रमाचा पंचक्रेशीतील होतकरू विद्यार्थ्यांनी अवश्य लाभ घ्यावा, असेही कार्यक्रमात जाहीर करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. एन. डी. जाधव यांनी केले. प्रा. स्वाती पाटील यांच्या आभार प्रदर्शनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

# महिला स्वयं सहायता गट; ६० लाख महिलांना लाभ

मुंबई दि. २८: उमेद अभियानातील महिलांच्या स्वयं सहाय्यता गटांना देण्यात येणाऱ्या फिरत्या निधीत दुपटीने वाढ करून ३० हजार रुपये निधी प्रत्येक गटांना देण्याचा तसेच कर्मचारी व चळवळीतील संसाधन व्यक्तींना देखील मानधनात भरीव वाढ करण्याची घोषणा मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी केली. मुख्यमंत्र्यांनी यासंदर्भात निवेदन केले. महिलांची देशाच्या विकासात महत्वाची भूमिका आहे.

आपल्या निवेदनात मुख्यमंत्री म्हणतात की, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत स्वयं सहाय्यता गटांना प्रती गट रु १५ हजार फ़िरता निधी देण्यात येतो. त्यामध्ये वाढ करुन प्रती समुह रु ३० हजार फ़िरता निधी देण्यात येईल. या वाढीमुळे अतिरिक्त रु ९१३ कोटी एवढ्या निधीची तरतुद राज्य शासनामार्फ़त करण्यात येणार आहे.

स्वयं सहाय्यता गटांना दैनंदिन मार्गदर्शन करण्यासाठी गावपातळीवर एकूण ४६ हजार ९५६ समुदाय संसाधन व्यक्ती (उठझ) कार्यरत आहेत. त्यांना सर्वसाधारणपणे दरमहा रु ३ हजार एवढे मानधन अदा करण्यात येते. बचत गट चळवळीतील त्यांचे योगदान व मागणी लक्षात घेऊन त्यांच्या मानधनात वाढ करून ते प्रति महा ६ हजार रुपये एवढे करण्यात येणार आहे. या करिता १६३ कोटी रुपये एवढ्या अतिरिक्त निधीची तरतुद करण्याची घोषणाही मुख्यमंत्र्यांनी केली. या अभियानात राज्यस्तरापासून ते क्लस्टर स्तरापर्यत स्वतंत्र, समर्पित व संवेदनशील यंत्रणा तयार करण्यात आलेली आहे. सद्यस्थितीत अभियानांतर्गत एकूण २७४१ कंत्राटी कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या मासिक मानधनामध्ये २० टक्के वाढ करण्यात येणार आहे तसेच त्यांच्या इतरही मागण्या मान्य करण्यात आल्या आहेत, असेही मुख्यमंत्री म्हणाले.

स्वयं सहाय्यता गटातील महिलांनी उत्पादीत केलेल्या वस्तुचे मूल्यवर्धन करणे ,गुणवत्तेत वाढ करणे , आधुनिक पॅकेजिंग व ब्रॅन्डींग करिता प्रोत्साहन देणे व उत्पादनांना हक्काची बाजारेपठ मिळवून देणे इत्यादी उपक्रम राबवून ग्रामीण महिलांचे सर्वार्थाने सक्षमीकरण करण्यासाठी शासन भविष्यात देखील कटीबध्द असल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

शालेय विद्यार्थ्यांचे गणवेश देखील महिला स्वयं सहायता गटांमार्फत देण्यात येतील असे मुख्यमंत्री म्हणाले.

मुख्यमंत्री आपल्या निवेदनात म्हणाले की, उमेद अभियानांतर्गत आतापर्यत सुमारे ६ लाख स्वयं सहाय्यता समूह स्थापित करण्यात आले असून यामध्ये ६० लाखांपेक्षा अधिक महिलांचा समावेश आहे. तसेच ३० हजार ८५४ ग्रामसंघ व १ हजार ७८८ प्रभागसंघ आहेत. या महिलांना उत्पन्न मिळावे म्हणून उमेद अभियान तसेच बॅकामार्फ़त अर्थसहाय्य देण्यात येते. स्वयं सहाय्यता गट स्थापन झाल्यानंतर ३ महिन्यानंतर त्यांना अंतर्गत कर्ज व्यवहाराला अर्थसहाय्य म्हणून रु.१० हजार ते रु १५ हजार याप्रमाणे फिरता निधी वितरीत करण्यात येतो.

आतापर्यत ३ लाख ९१ हजार ४७६ गटांना रु. ५८४ कोटीचा फिरता निधी देण्यात आला आहे. तसेच आतापर्यंत ८० हजार ३४८ समूहांना रु.५७७ कोटीचा समुदाय गुंतवणूक निधी देण्यात आला आहे.

आतापर्यत बॅकामार्फ़त राज्यातील ४.७५ लाख स्वयं सहाय्यता गटांना रु. १९ हजार ७७१ कोटीचे कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले आहे. यामध्ये २०२२-२३ या एकाच वर्षात २ लाख ३८ हजार ३६८ स्वयं सहाय्यता गटांना तब्बल रु. ५ हजार ८६० कोटीचे बँक कर्ज देण्यात आले आहे.

अभियानाअंतर्गत ९६% बँक कर्जाची परतफेड वेळेवर होत असून सध्यस्थितीत NPA चे प्रमाण फ़क्त ४.३१% आहे त्यामुळे स्वयं सहाय्यता समूहांना कर्ज देण्यामध्ये बँका पुढे येत असून या गटातील महिलांना पतपुरवठा करण्यासाठी बॅका मोठ्या प्रमाणात सहकार्य करीत आहेत.

# सततच्या पावसात खरीप पिकांची अशी घ्या काळजी

## कृषि विभागाकडून शेतकऱ्यांना मार्गदर्शन

लातूर : जिल्ह्यात मागील चार-पाच दिवसांपासून झालेल्या संततधार पावसामुळे पिकाच्या वाढीवर परिणाम दिसून येवू शकतो. तसेच तणांचा प्रादुर्भाव वाढत असून आंतरमशागतीच्या कामांना बाधा निर्माण होवू शकते. अशा परिस्थितीमध्ये शेतकऱ्यांनी पिकांची कशी काळजी घ्यावी, याविषयी जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी रक्षा शिंदे यांनी खालीलप्रमाणे मार्गदर्शन केले आहे.

शेतात साचलेला पाण्याचा निचरा करावा- वापसा येताच बळीराम नांगराने चार ओळीनंतर सरी पाडून घ्यावी जेणेकरून यापुढील काळात शेतात अतिरिक्त पाणी साचून राहणार नाही.

अन्नद्रव्ये व्यवस्थापन- चराद्वारे शेतामध्ये साचलेले पाणी शेताबाहेर काढून देणे. मागील काही दिवसांत होत असलेल्या संततधार पावसामुळे जमिनीतील अन्नद्रव्यांचे प्रमाण कमी झाले आहे. त्यासोबतच जमिनी वापशावर येत नसल्यामुळे पिके जमिनीतील अन्नद्रव्ये घेऊ शकत नाहीत. यामुळेच सोयाबीनचे पीक पिवळे पडले आहे. अशा परिस्थितीमध्ये फवारणीद्वारे १९:१९:१९, ५० ग्रॅम + सूक्ष्ममूलद्रव्ये ग्रेड-२५० मिली प्रति १० लिटर पाणी याप्रमाणे फवारणी करावी.

तणांचे व्यवस्थापन- जमिनी वापशावर येताच आंतरमशागतीद्वारे कोळपणी करून घ्यावी. आंतरमशागत करणे शक्य नसल्यास पीक एक महिन्याच्या असेपर्यंत तणनाशकाच्या मदतीने तणांचा बंदोबस्त करून घ्यावा. उगवणी पश्र्चात तणनाशकामध्ये ओडीसी ४० ग्रॅम किंवा परस्युट ४०० मिली २०० लिटर पाण्यातून एक एकर क्षेत्रावर फवारणी घ्यावी. तणनाशक फवारणीसाठी स्वतंत्र पंप असावा तसेच स्वच्छ पाणी वापरावे.

कीड आणि रोगाचे व्यवस्थापन- सोयाबीन पीक २५ ते ३० दिवसांचे झाले असेल तर कीड आणि रोगाच्या नियंत्रणासाठी थायोमिथोक्झाम + लॅमडा साह्यलोथ्रीन (अलिका) ०३ मिली किंवा कोराजन ०३ मिली किंवा प्रोफेनोफॉस ५० टक्के २० मिली यासोबत साफ (मॅन्कोझेब आणि कार्बेडाझीम) हे बुरशीनाशक २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यातून फवारणी घ्यावी. तूर पिकामध्ये मर रोगाच्या प्रतिबंधात्मक उपाययोजनेसाठी बायोमिक्स किंवा ट्रायकोडर्मा २०० मिली प्रति १० लिटर पाण्यात घेऊन ओळीच्या बाजूने ड्रेचींग किंवा आळवणी घ्यावी.

गोगलगाय प्रादुर्भाव नियंत्रण- शंखी गोगलगाय गोळा करून मिठाच्या पाण्यात टाकुन नष्ट कराव्यात. गोगलगायच्या नियंत्रणाकरीता दाणेदार मेटाल्डीहाईड हे गोगलगाय नाशक २ किलो प्रति एकर या प्रमाणे शेतामध्ये बांधाच्या कडेला आणि बांधावर सायंकाळच्या वेळी पसरुन द्यावे. गोगलगायीचे अंडी आढळून आल्यास कोळपणी करून नष्ट करावेत.

दुबार पेरणी- ज्याठिकाणी दुबार पेरणी करावी लागणार आहे, त्यासाठी सोयाबीन आणि तूर या आंतरपीक पद्धतीचा किंवा सलग तूर पीक किंवा सूर्यफूल या पिकाची निवड करून पेरणी करावी.

## जाहीर प्रगटन

दि.२७/०७/२०२३

या जाहीर प्रगटनानुसार नागरीकांना कळविण्यात येते की खालील यादीप्रमाणे लातूर महानगरपालिका, लातूर प्लॉट घेणाऱ्यांनी नामांतरासाठी अर्ज दाखल केला आहे. तरी सदरील नामांतराबाबत नागरीकांच्या सुचना किंवा हरकती असेल त्यांना हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून सात (७) दिवसाच्या आत लातूर महानगरपालिका आयुक्त यांचेकडे लेखी स्वरूपात नाहरकत दाखल करावयात तर कोणतेही हरकती आल्या नाही तर नामांतर मंजूर करून त्याप्रमाणे नाव लावण्याचे कार्यवाही करण्यात येईल.

| क्र. | जागा खरेदी करणाऱ्याचे नाव | जागा विक्री करणाऱ्याचे नाव | सर्वे नंबर व प्लॉट नंबर | क्षेत्रफळ |
|---|---|---|---|---|
| १८५० | नजीर गफूरसाब शहा | अबरार इलियास अहमदखान | १२९ | १२०० चौ. फु. |
| १८५१ | नूरजहाँ बेगम समीयोद्दीन बागवान | अजहर समीयोद्दीन बागवान | १२९ | १०३० चौ. फु. |
| १८५२ | राजकुमार नरसिंग बंडगर | नरसिंग बंडगर | - | ११८५.७५ |
| १८५३ | तुकाराम नामदेव कंदापुरे | महेश शिवाजी गोडभरले | २५७ | ७२.३० चौ. मी. |
| १८५४ | सुजावओद्दीन असदुल्ला शेख | असदुल्ला मियासाब शेख | ४७७ पै. | ५०० चौ. फु. |
| १८५५ | संजय अनिरूद्ध भुसारे व इतर | अनिरूद्ध तुकाराम भुसारे | - | ५२५ चौ. फु. |
| १८५६ | शहानवाज दस्तगीर सय्यद | शेख रहेमान | ३०९ | ४० x २४ |
| १८५७ | ईश्वर केशव भंडारकोटे | सहदेव वाघमोडे | - | ४५० चौ. फु. |
| १८५९ | सौ. सविता विश्वनाथ शेळके | दर्शन नवीनचंद्र जैन | ७६२१ | १४४१.२० चौ. फु. |
| १८६० | बालाजी पांडुरंग गडदे | पांडुरंग गडदे | - | २४ x ५० |
| १८६१ | सुनंदा रामदास बिराजदार व इतर | रामदास बिराजदार | - | ८७.९४ |
| १८६१ | इशरतबी अमीर शेख | अमीर मदार शेख | - | १००० चौ. फु. |
| १८६२ | रविंद्र संदीपान सुतार | संदीपान किशन सुतार | २८ | १५ x १९ |
| १८६३ | धर्मवीर योगीराज भारती | प्रशांत पंडीतराव चेडे | २२३/अ | ७७.१९ |
| १८६४ | धर्मवीर योगीराज भारती | लोहिया बिल्डर्स पै. | २२३/अ | ७६.५८ |
| १८६५ | ओमप्रकाश विजयकुमार गिरी | लोहिया बिल्डर्स पै. | २२३/अ | ७६.७४ |
| १८६६ | सौ. मनिषा रूपगीर पुरी | लोहिया बिल्डर्स पै. | २२३/अ | ७६.७४ |
| १८६७ | धर्मवीर योगीराज भारती | लोहिया बिल्डर्स पै. | २२३/अ | ७६.७४ |
| १८६८ | शुभम शिवराज चाकोते व इतर | बसवंत पंढरीनाथ पाटील | - | ४२ x २० |
| १८६९ | महेबूबपाशा गणी शेख | फैजलखान जकीखान कायमखानी | ९८८२ | ६०० चौ. फु, |
| १८७० | असलमफैज सैफुल्लाखान पठाण | सलीम अब्दुल कादर | २६०/अ | १३० चौ. मी. |
| १८७१ | योगानंद शिवानंद दाडगे | विजयकुमार अग्रोया | २४४/अ | २००० चौ. फु. |
| १८७२ | महेबूब हसन दगडूमियाँ शेख | इब्राहीम मैनोद्दीन शेख | १२९ पै. | ६०.६४ चौ. फु. |

स्वाक्षरीत/-
कर अधिक्षक
क्षेत्र क्र. D
लातूर शहर महानगरपालिका, लातूर


छोटी झेरॉक्स मशीन व प्रिंटर विक्री
कलर प्रिंट/झेरॉक्स
B/W प्रिंट/झेरॉक्स
जम्बो झेरॉक्स/प्रिंट
डिझाईनिंग/पासपोर्ट फोटो
रिफीलींग/टोनर/फोटो पेपर
लॅमिनेशन मशिन व मटेरिअल
झेरॉक्स मशीनचे अधिकृत विक्रेते :
बोरा झेरॉक्स
व्यापारी धर्मशाळा, महात्मा गांधी चौक, लातूर.
9673344777

श्री.तिरूपती
ट्रेडींग कंपनी
शिवाजी चौक,
निलंगा, जि. लातूर
जैन ठिबक सिंचन
जैन स्प्रिंकलर
जैन पी.व्ही.सी.पाईपचे
-: अधिकृत विक्रेते:-
प्रो. गुणवंत गायकवाड हलगरकर
फोन:-दु. २४२४६३,
मो.९४०४६८२९९९



SINCE 1972
माळवदकर एजन्सीज
सावेवाडी, लातूर
mo. 9422656522
सर्व प्रकारच्या फर्निचरचे उत्पादक व विक्रेते